सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, २ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १३२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

## SC,ST मध्ये उपवर्ग तयार करण्यास मंजुरी, आरक्षणाचा लाभ फक्त पहिल्या पिढीला मिळावा

नवी दिल्ली: आरक्षणासंदर्भात गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय दिला आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (SC/ST) आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयातील सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने एक मोठा निर्णय दिला. सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने ६ विरुद्ध १च्या बहुमताने एसी आणि एसटी आरक्षणाच्या अंतर्गत काही उपवर्ग तयार करायला मंजुरी दिली आहे. आतापर्यंत ही मुभा फक्त ओबीसी आरक्षणाला लागू होती.

सात न्यायाधीशांच्या या घटनापीठाने ईव्ही चिन्नैया यांच्या २००४चा निर्णय बदलला आहे. तेव्हा SCआणि ST अंतर्गत उपवर्ग करुन अन्य जातींना विशेष लाभ देण्यास इनकार दिला. या सुनावणीत न्यायमूर्ती पंकज मिथल यांनी आरक्षणाचा लाभ हा कोणत्याही वर्गातील फक्त पहिल्या पिढीला मिळाला पाहिजे, असे मत व्यक्त केले.

न्यायमूर्ती मिथल यांनी आरक्षणाची वेळोवेळी समीक्षा करण्याचे आवाहन केले. जेणेकरून हे समजू शकेल की दुसरी पिढी सामान्य वर्गाच्या खांद्याला खांदा लावून चालली आहे. इतकेच नाही तर न्या. मिथल यांनी स्पष्टपणे सांगितले की, आरक्षणाचा लाभ हा फक्त पहिल्या पिढीला मिळाल पाहिजे. दुसऱ्या पिढीला आरक्षणाचा लाभ मिळता कामा नये. त्याच बरोबर सरकारला हे देखील पाहिले पाहिजे की, दुसरी पिढी सामान्य वर्गासोबत पोहोचली आहे का? या घटनापीठात सरन्यायाधीश चंद्रचूड, न्या.बीआर गवई, न्या. विक्रम नाथ, न्या.बेला एम त्रिवेदी, न्या.पंकज मिथल, न्या.मनोज मिश्रा आणि न्या. सतीश चंद्र मिश्रा यांचा समावेश होता.

एसी आणि एसटी हे आरक्षण घटनेने दिली आहेत. तर १९९२ नंतर मंडल आयोगाच्या शिफारसीनंतर ओबीसी आरक्षण हे नंतर लागू करण्यात आले आहे.

क्रिमीलेअर बाबत मोठी कमेंट

ज्या प्रमाणे ओबीसी आरक्षणात क्रिमीलेअर लागू आहे. तसेच एसी, एसटीमध्ये लागू केले जावे असे मत या सुनावणीत व्यक्त करण्यात आले. ओबीसी आरक्षणात क्रिमीलेअरची अट आहे. ज्यांचे वार्षीक उत्पन्न ८ लाखापेक्षा जास्त आहे त्यांना ओबीसी आरक्षणाचा लाभ घेता येत नाही. ही अट आतापर्यंत एसी, एसटीसाठी नव्हती. आता न्यायालयाने या आरक्षणात देखील क्रिमीलेअरची ओळख केली जावी आणि त्यांना आरक्षणाच्या बाहेर ठेवले जावे, असे मत व्यक्त केले आहे.

## भारताला मिळाले तिसरे ऑलिम्पिक पदक

पॅरिस : पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने आतापर्यंत तीन पदके जिंकली आहेत. स्टार नेमबाज मनू भाकर आणि सरबज्योत सिंगनंतर पॅरिस ऑलिम्पिक २०२४च्या सहाव्या दिवशी कोल्हापुरच्या मराठमोळ्या स्वप्नील कुसाळे याने ५० मीटर रायफल ३ पोझिशन नेमबाजीत भारताला आणखी एक कांस्यपदक जिंकून दिले आहे. १९९५ मध्ये महाराष्ट्रातल्या कोल्हापुर येथे जन्मलेला स्वप्नील कुसळेने पॅरिस ऑलिम्पिक २०२४च्या ५० मीटर रायफल ३ पोझिशनमध्ये ४५१.४ गुण नोंदवून इतिहास रचला. तसेच खाशाबा जाधवांच्यानंतर स्वप्नील कुसळेने महाराष्ट्राला दुसरे ऑलिम्पिक पदक जिंकून दिले आहे.

भारतीय नेमबाज स्वप्नील कुसळेने मंगळवारी झालेल्या क्वालिफायर फेरीत ५० मीटर रायफल ३ पोझिशन नेमबाजीत एकूण ५९० गुण मिळवून फायनलमध्ये धडक मारली होती.

## पॅरिस ऑलिम्पिकदरम्यान भारतासाठी वाईट बातमी

मुंबई: पॅरिस ऑलिम्पिक २०२४ दरम्यान भारतासाठी वाईट बातमी समोर आली आहे. भारताची महिला गोल्फर दीक्षा डागर हिचा कार अपघात झाला आहे. या अपघातात दीक्षाला दुखापत झाली नाही मात्र तिची आई जखमी झाली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार दीक्षा डागरचा कार अपघात ३० जुलैला संध्याकाळी पॅरिसमध्ये झाला आहे. त्यात तिची आई जखमी झाली आहे. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिला पाठीला दुखापत झाली आहे. दीक्षा ठीक असून ती पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आपल्या सामन्यात खेळेल. अपघातावेळेस कारमध्ये कुटुंबातील ४ सदस्य होते. या अपघातात दीक्षाच्या आईला पाठीला दुखापत झाली तर भावाला किरकोळ दुखापत झाली. तर वडील आणि दीक्षाला कोणतीही दुखापत झाली नाही. तिची आई रुग्णालयात आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिला गोल्फ इव्हेंट ७ ते १० ऑगस्टदरम्यान होणार आहे. या दरम्यान दीक्षाचा सामना ७ ऑगस्टला होणार आहे. भारताकडून महिला गोल्फ इव्हेंटमध्ये दीक्षाशिवाय आदिती अशोकही भाग घेत आहेत.




# जितेंद्र आव्हाड यांच्यावरील हल्ल्यानंतर ठाण्यात उद्रेक, संतप्त कार्यकर्त्यांनी पूर्व दृतगती महामार्ग रोखला!

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीवर मुंबईत झालेल्या हल्ल्यानंतर ठाण्यात आव्हाड दाखल होताच त्यांच्या समर्थकांनी पूर्व दृतगती महामार्गावर विवियाना मॉलसमोर या हल्ल्याच्या निषेधार्थ रास्ता रोको केला. त्यामुळे घोडबंदर रोडच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर कोंडी झाली होती. पोलिसांनी या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. दरम्यान, या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आव्हाड यांच्या ठाण्यातील घराबाहेर पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीवर मुंबईत झालेल्या हल्ल्यानंतर ठाण्यात त्याचे पडसाद उमटले. आव्हाड आपल्या निवासस्थानी दाखल होताच संतप्त कार्यकर्त्यांनी ठाण्यातील पूर्व दृतगती महामार्गासह मुंब्र्यातील अमृतनगर येथे रास्ता रोको केला. तसेच या हल्ल्याचा निषेध देखील करण्यात आला. यावेळी आव्हाड समर्थकांनी राज्य सरकार आणि भाजपविरोधात घोषणाबाजी केली. पोलिसांनी या कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले. दरम्यान, या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आव्हाड यांच्या ठाण्यातील घराबाहेर पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

कार्यकर्त्यांनी महामार्ग रोखला

मुंबईत आव्हाड यांच्या गाडीवर दुपारी झालेल्या हल्ल्यानंतर ठाण्यातील आव्हाड यांच्या घराबाहेर कार्यकर्त्यांची गर्दी वाढली. आव्हाड घराजवळ येताच जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आव्हाड यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करणाऱ्या कार्यकर्त्यांनी थेट त्यांच्या विवियाना मॉलशेजारील घराजवळून पूर्व दृतगती महामार्गावर धाव घेतली. याठिकाणी संतप्त कार्यकर्ते व महिला पदाधिकाऱ्यांनी महामार्ग रोखला.

आंदोलनाने वाहतूक विस्कळीत

या कार्यकर्त्यांनी आव्हाड यांच्या हल्ल्याच्या निषेधार्थ घोषणाबाजी केली. यावेळी काही कार्यकर्त्यांनी टायर जाळण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलीस वेळीच घटनास्थळी दाखल झाल्याने परिस्थिती नियंत्रणात आली. पोलिसांनी या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. तोपर्यंत ठाण्याहून घोडबंदरच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर कोंडी झाली होती. मुंब्र्याच्या अमृतनगर येथे ठाणे पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते शानू पठाण आणि सामाजिक कार्यकर्त्या मर्जिया पठाण यांच्यासह राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर ठिय्या देत निदर्शने केली. त्यामुळे याठिकाणीही वाहतूक विस्कळीत झाली.









सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## फारोळा ग्रामपंचायत येथे अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी निमित्त नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन



बिडकीन दि. ३१ जुलै पैठण तालुक्यातील फारोळा ग्रामपंचायत कार्यालयात अहिल्याबाई होळकर यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी फारोळा ग्रामपंचायत सरपंच सलीम पठाण यांच्या हस्ते अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले यावेळी गावातील महिला सामाजिक कार्यकर्त्या अनिता रामकृष्ण धुमाळे, व शालिनी लक्ष्मण थोरात,यांचा ग्रामसेविका आशा तुपे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले तसेच अहिल्याबाई होळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त ग्रामपंचायत कार्यालयात लायन्स नेत्र रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते, याप्रसंगी सरपंच सलीम पठाण, ग्रामसेविका आशा तुपे, उपसरपंच शितल चाव्हुरे,कमल गोरे, पल्लवी गोरे,सरला पोपळघट, विष्णू पोपळघट , इलियास पठाण,तजीजाबी पठाण, रेखा इंदापूरे, अशोक गोरे,सांडु धुमाळ, विष्णू धरपळे, मारोती जाधव, संदीप चाव्हुरे, दिलीप गोरे, गायकवाड,तेजेस जाधव,संजय धुमाळ, रविंद्र पवार, तसेच लायन्स नेत्र रुग्णालयाचे डॉ. संदीप गायकवाड, डॉ. मंगेश देशमुख व गावातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शिक्षण प्रेमी योगेश बोखारे यांच्या वाढदिवसानिमित्त रामजीनगर येथील विद्यार्थ्यांना वह्याचे वाटप



सोयगाव,दि.१ ऑगस्ट : सोयगांव शहरातील काळेनगर भागातील रहीवाशी,शिक्षण प्रेमी,शालेय व्यवस्थापन समिती रामजीनगर येथील सदस्य योगेश बोखारे यांच्या ४३ व्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथील संपूर्ण विद्यार्थ्यांना भैरवनाथ मंदीर संस्थान अध्यक्ष तथा कै.बाबुराव काळे पतसंस्था सोयगांव चेअरमन दिलीप बिर्ला,समाजसेवक तथा ज्येष्ठ पत्रकार संजय शहापुरकर,नगरसेवक गजानन कुडके,माजी नगरसेवक संजय मोरे,राजेंद्र एलीस,होमगार्ड विशाल घन, शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सहशिक्षक गोपाल चौधरी यांच्या शुभ हस्ते वह्याचे वाटप करण्यात आले. त्यांच्या या उपक्रमाचे शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सहशिक्षक गोपाल चौधरी यांच्यासह शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष,सदस्य,पालक यांनी कौतुक केले.तसेच सोयगांव शहरातील भैरवनाथ पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर काळे यांच्या सह पतसंस्थेचे संचालक कदीर शहा,मोतीराम पंडीत,नगरसेवक संतोष बोडखे,मॅनेजर धनराज औरंगे,गटसचिव दिलीप रावणे,विजय जावळे,योगेश काळे,कै.बाबुरावजी पतसंस्थेचे मॅनेजर सिताराम गोतमारे यांनी योगेश बोखारे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

## श्री क्षेत्र जैनगिरी (जटवाडा) येथे हरियाली अमावस्या निमीत्त पंचामृत अभिषेक व महाप्रसादाचे आयोजन



औरंगाबाद प्रतिनिधी – शहरापासुन १२ कि.मी.अंतरावरील असलेल्या हजारो जैन बांधवांचे श्रध्दास्थान श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक ४ ऑगस्ट २०२४ रोजी हरियाली अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात करण्यात येणार आहे. यावेळी सर्व उपस्थित समाज बांधवांना सकाळी ११ते २ या वेळेस नंदलालजी राजेंद्रजी निलेशजी ठोले परिवार देशमुख नगर ईटावाला परीवार यांचा, वतीने महाप्रसाद दिला जाणार आहे. अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा होवुन सायंकाळी भगवंताची आरतीही करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादी दाता ठोले परिवार अध्यक्ष विनीत लोहाडे व महामंत्री प्रमोद पांडे दिलीप सेठी यांनी केले आहे.

# अण्णाभाऊ साठे याचे जीवनकार्य प्रेरनादायी अब्दुल सत्तार

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम या चळवळींमध्ये अण्णाभाऊंचे योगदान विसरता येणार नाही असे सांगत अण्णाभाऊ साठे यांचे जीवनकार्य प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन राज्याचे पणन व अल्पसंख्याक विकास मंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केले.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सिल्लोड शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात ना. अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ना. अब्दुल सत्तार बोलत होते.

पुढे बोलत असतांना ना. अब्दुल सत्तार म्हणाले की, सिल्लोड येथील अण्णाभाऊ साठे चौकाचे काम प्रगतीपथावर सुरू असून लवकरच हे काम पूर्ण होईल, शहरात अण्णाभाऊ यांचा पूर्णाकृती पुतळा देखील बसविण्यात येणार असून या कामाला लवकरच सुरुवात होणार असल्याचे ना.अब्दुल सत्तार म्हणाले. अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार मिळावा यासाठी पालकमंत्री या नात्याने ठराव घेऊन शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे ना. अब्दुल सत्तार यांनी सांगितले.



याप्रसंगी अण्णाभाऊ जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अब्दुल समीर, ज्येष्ट नेते श्रीरंग पा. साळवे, माजी नगराध्यक्षा श्रीमती राजश्री निकम, शिवसेना उपजिल्हाप्रमुख दुर्गाबाई पवार, शकुंतलाबाई बन्सोड, दीपाली भवर, मेघा शाह, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, शिवसेना शहरप्रमुख मनोज झंवर, नॅशनल सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, किशोर अग्रवाल, माजी नगराध्यक्ष पांडुरंग दुधे, संजय आरके, विठ्ठल सपकाळ, शंकरराव खांडवे, सयाजी वाघ, प्रशांत क्षीरसागर, बबलू पठाण, रवी गायकवाड, फहिम पठाण, राजुमिया देशमुख यांच्यासह लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी सखाराम आहिरे, अशोक कांबळे, साहेबराव सोनवणे, नानासाहेब गायकवाड, विष्णू सोनवणे ,फकीरचंद तांबे, बाबुराव आहिरे , सुनील आहिरे, महिंद्र आहिरे , भिकन कांबळे, संदीप मानकर,संजय कांबळे, अशोक शिंदे, सुखदेव कांबळे, काशिनाथ शिंदे ,नितीन सौदागर ,अमोल खेत्रे ,रवींद्र महाले, विठ्ठल कांबळे ,साहेबराव आहिरे, ज्ञानेश्वर आहिरे, त्र्यंबक शेजुळ, शिवदास दनके आदींची उपस्थिती होती.

# मोकाट जनावरांचा सुळसुळाट ! वाहतूक कोंडीने वाहनधारक हैराण

तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.०१ ऑगस्ट - कन्नड शहरातील मुख्य रस्त्यावर मोकाट जनावरांना सुळसुळाट झाल्याने वाहतूक कोंडीने वाहनधारक हैराण झाले आहेत तर व्यापाऱ्यांना सुद्धा या त्रासाला सामोरे जावे लागत आहे

शहरातून जाणार राष्ट्रीय महामार्ग २११ चाळीसगांव कन्नड वर मोकाट



जनावरांनी कब्जा केल्याने वाहतूक कोंडी होत आहे,मोकाट जनावरे रस्त्याच्या मधोमध बसतात त्यामुळे काही काळ वाहने थांबवावी लागतात त्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे,त्याचा फटका व्यापाऱ्यांना बसत आहे. सदर मोकाट जनावरांनाच्या कानाला चिठ्ठी लावलेली आहे यामध्ये गाय,बैल असे जनावरे असून हे जनावरे रस्तावरून हलण्यास तयार नसतात.शहरातून जाणारा हिवरखेडा नागड राज्य महामार्ग, पिशोर-सिल्लोड राज्य महामार्गावर अधिक प्रमाणात मोकाट जनावरे बसलेले असतात, त्यामुळे छोटे मोठे अपघात सुद्धा होत आहे,या मोकाट जनावरांचा तत्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिक करत आहे.

**रस्ताच्या मध्यभागी ही मोकाट जनावरे असल्यामुळे वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे,दुकानासमोर वाहतूक कोंडी झाल्याने ग्राहकांवर त्याचा परिणाम दिसत आहे,प्रशासनाने तत्काळ या जनावरांचा बंदोबस्त करावा**

**–सिद्धार्थ निकाळजे, हॉटेल व्यावसायिक**

**शहराच्या सुरुवातीलाच दुभाजक जवळ मोकाट जनावरे बसलेले असतात त्यामुळे बरीच वाहने विरुद्ध दिशेने जातात त्यामुळे छोटे मोठे अपघात होत आहे,हे टाळण्यासाठी ठोस पावले उचलावीत**

**–प्रशांत राजपूत,नागरिक**

**मोकाट जनावरांबाबत नागरिकांच्या तक्रारी येत असून याबाबत पावले उचलण्यात आलेली आहे,मोकाट जनावरे ज्यांची आहेत त्यांनी ते घेऊन जावी नसता नगरपालिका प्रशासन मोकाट जनावरांना ताब्यात घेणार आहेत**

**–नंदकिशोर भोंबे, मुख्यधिकारी तथा प्रशासक कन्नड नगरपरिषद**

**मोकाट जनावरांमुळे रहदारीसह अडथळा निर्माण होत आहे,या जनावरांचा लवकरात लवकर बंदोबस्त करम्यात यावा अन्यथा भारतीय जनता पार्टीच्या वतीने नगरपालिके समोर आंदोलन करण्यात येईल**

**– सुनिल पवार, माजी नगरसेवक भाजप शहराध्यक्ष**

# शिक्षण विभागाच्या लेखी आश्वासनानंतर कार्यालयासमोर शाळा भरवण्यास स्थगिती

## पंधरा दिवसात भरणार रिक्त पदे, न भरल्यास पालक, विद्यार्थी, ग्रामपंचायत करणार उपोषण

तभा वृत्तसेवा

नाचनवेल:दि.१. ऑगस्ट- कन्नड तालुक्यातील शेलगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, प्राथमिक शाळा शेलगाववाडी, प्राथमिक शाळा देव्हारीवाडी येथील चार शिक्षकांचे पदे गेल्या दोन वर्षापासून रिक्त आहे. ग्रामपंचायत, पालक व ग्रामस्थ यांनी शिक्षण विभागाला अनेक वेळा निवेदन दिले. विनंती केल्या लेखी व तोंडी स्वरूपात पाठपुरावा केला,मात्र शिक्षण विभागाने यांच्या मागण्याकडे दुर्लक्ष केले आहे तसेच अद्यापही या जागा रिक्त आहेत .त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षका अभावी शैक्षणिक नुकसान होत आहे .विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रशासन विविध उपक्रम व योजना राबवित आहे मात्र शिक्षकच नसेल तर या



सर्वांचा काय उपयोग अशा शब्दात शालेय समिती अध्यक्ष यांनी आपले मत व्यक्त केले. आमची परिस्थिती खाजगी शाळेमध्ये शिकवण्याची नाही त्यामुळे आम्हाला जिल्हा परिषद शाळे शिवाय पर्याय नाही पण अशी परिस्थिती जर असेल तर आमच्या मुलांचे भविष्य कसे उज्वल होणार याकडे शिक्षण विभागाने व प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे असे मत पालकानी व्यक्त केले. रिक्त पदे न भरल्याने सरपंच, ग्रामस्थ, पालकांमध्ये संताप निर्माण झाला . त्यामुळे त्यांनी गुरुवार दिनांक १/८/२०२४ रोजी शिक्षण विभाग छत्रपती संभाजीनगर कार्यालय समोर शाळा भरवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड यांनी दिलेल्या सर्वसक्षम लेखी आश्वासनानंतर सरपंच, पालक व ग्रामस्थांनी शिक्षण विभाग कार्यालयासमोर शाळा भरवण्यास दोन आठवड्याच्या कालावधी पर्यंत स्थगिती करण्याचा निर्णय घेतला आहे. शिक्षण विभागाने दिलेल्या मुदतीनंतर जर रिक्त पदे भरल्या गेले नाही तर मात्र आम्ही यावेळी कोणतेही कारण ऐकून घेणार नाही व शिक्षण विभाग कार्यालयासमोर विद्यार्थी ,पालक, ग्रामपंचायत सर्व कायदेशीर मार्गाने आमरण उपोषण सुरू करू असे मत सरपंच पालक यांनी व्यक्त केले. शिक्षकांची संख्या कमी असल्याकारणाने या शाळेतील विद्यार्थी पटसंख्या कमी होत आहे याला जबाबदार शिक्षण विभाग आहे असे देखील मत पालक वर्गांनी व्यक्त केले आहे. यावेळी केंद्रप्रमुख के. आर. सपकाळ यांनी सरपंच विलास मनगटे, उपसरपंच युनुस पटेल, तंटामुक्ती अध्यक्ष शिवाजी मनगटे, यांच्या व पालकांच्या उपस्थितीत लेखी व तोंडी आश्वासन दिले.

## यशवंतनगर येथील सप्तश्रृंगी सभागृहात संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन शाखा पैठणच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर संपन्न



तभा वृत्तसेवा पैठण दि १ :- यशवंतनगर येथील सप्तश्रृंगी सभागृहात संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन शाखा पैठणच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरात ३३ रक्तदात्यांनी रक्तदान केले.शासकीय रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे हे रक्त संचलित करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन डॉ शैलेश घोडके डॉ पंडित किल्लारीकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी छत्रपती संभाजीनगर क्षेत्रिय संचालक विजय बोडखे,पैठणचे पुंजाराम कोरडे बद्रीनाथ घटे बिराजदार अविनाश केथा यांच्यासह तालुक्यातील भक्तगण उपस्थित होते.

## किंगडम ऑफ व्हाइट लाइफस्टाइल ब्रँडने १०व्या स्टोअरच्या उद्घाटनाची केली घोषणा

छत्रपती संभाजीनगर, १ ऑगस्ट : किंगडम ऑफ व्हाइट या पुरूषांसाठी पांढऱ्या रंगाचे पोशाख डिझाइन करणाऱ्या भारतातील पहिल्या ऑल-व्हाइट लाइफस्टाइल ब्रँडने छत्रपती संभाजीनगरमध्ये आपल्या १०व्या स्टोअरच्या उद्घाटनाची घोषणा केली आहे. हे नवीन स्टोअर भारतभरातील अधिकाधिक व्यक्तींसाठी आकर्षक व लक्षवेधक व्हाइट स्टाइल्स आणण्याच्या किंगडम ऑफ व्हाइटच्या प्रवासामधील महत्त्वपूर्ण टप्पा आहे. हे स्टोअर प्रोझोन मॉल, एपीआय रोड, एन १, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे सुरु झाले आहे. या स्टोअरमध्ये किंगडम ऑफ व्हाइटच्या प्रीमियम शर्टस्, बॉटम्स व ॲक्सेसरीजची सिग्नेचर श्रेणी पाहायला मिळेल. ही सर्व उत्पादने सर्वोत्तम घटकांचा वापर करून बारकाईने डिझाइन करण्यात आली आहेत, ज्यामधून अद्वितीय दर्जा व आरामदायीपणाची खात्री मिळते. किंगडम ऑफ व्हाइट उच्च दर्जाचे, स्टायलिश व आरामदायी व्हाइट ॲपरल प्रदान करण्याप्रती, तसेच वैविध्यपूर्ण व शाश्वत फॅशन निवडींच्या माध्यमातून प्रत्येकाच्या वॉर्डरोबमध्ये पांढऱ्या रंगाच्या पोशाखांना मुख्य स्थान देण्याप्रती कटिबद्ध आहे. किंगडम ऑफ व्हाइटचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) विनीत हरलालका म्हणाले. ''आमचे व्हाइट रंगाच्या पोशाखांचा साधेपणा व आकर्षकतेला नव्या उंचीवर घेऊन जाण्याचे मिशन आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये आमच्या १०व्या स्टोअरच्या उद्घाटनामधून प्रत्येकाच्या वॉर्डरोबमध्ये व्हाइट रंगाच्या पोशाखांना मुख्य स्थान बनवण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए.क. ३००/२०२४

अर्जदार : १. संगीता भ्र. जगन्नाथ कानडे, रा. रांजणगाव शे.पु.ता.गंगापूर जि.छ संभाजीनगर ह.मु. अशोकनगर, ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर २. गणेश जगन्नाथ कानडे, रा. को-हाळे ता. राहता, जि. अहमदनगर ३. स्वाती जगन्नाथ कानडे, (लग्नापूर्वीचे नाव) स्वाती भ्र. अश्विन खरात, (लग्नानंतरचे नाव) रा.उंबरगाव ता. श्रीरामपुर

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी मयत जगन्नाथ एकनाथ कानडे यांचे वारस असल्याबाबत प्रकरण या मा. न्यायालयात त्यांचे विधीज्ञ अविनाश चव्हाण यांच्या मार्फत दाखल केला असून अर्जदारांनी अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार क. १ चे पती व अर्जदार नं २ व ३ चे वडील मयत जगन्नाथ एकनाथ कानडे हे. दि. २४/१०/२०१२ रोजी रांजणगाव शे.पु ता. गंगापूर येथे मयत झालेले आहे. मयत जगन्नाथ एकनाथ कानडे यांना अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारसदार नाही. अर्जदारांना शासकीय तसेच निमशासकीय कामासाठी त्याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार हे मयत जगन्नाथ एकनाथ कानडे यांचे कायदेशीर वारसदार आहे व त्याप्रमाणे त्याचे वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदारांचे हक्कात जारी करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. तरी सदरील मागणीस कुणाचा काही आक्षेप उजर असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधीज्ञामार्फत न्यायालयात आक्षेप नोंदवावा मुदतीत आक्षेप न असल्यास न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे आदेश पारित करेल.

पुढील तारीख ३०/०८/२०२४

आदेशावरून
सहायक अधिक्षक
न्यायलय गंगापूर

## फारोळा ग्रामपंचायत येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

बिडकीन : फारोळा ग्रामपंचायत येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्सव साजरी पैठण तालुक्यातील फारोळा ग्रामपंचायत येथे आज दि १ ऑगस्ट रोजी सरपंच सलीम महमंद पठाण याच्या हस्ते .साहीत्यरत्न,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा स्मृतीदिना निमीत्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन करण्यात आले .यावेळी उपस्थित.ग्रामसेविका. आशा तुपे.उपसरपंच शितल



चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला,पोपळघट,विष्णू पोपळघट.तमिजाबी,पठाण, इलियास पठाण, तलाठी रविंद्र मोखेडे,अशोक गोरे,रवींद्र गोरे,संदिप चाव्हरे,अहेमद पठाण,मारोती जाधव,गंवादे मामा,दिलीप गोरे,गणेश गायकवाड,तेजस जाधव,संजय धुमाळ,रवींद्र पवार.मंगेश धुमाळ अदि गावकरी उपस्थित होते,



खामगांव श्री गोरक्ष बहुउद्देशिय संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना निसर्गरम्य वातावरणात मिळाले भोजन ! ! फुलंब्री प्रतिनिधी त.भा :देशात दि. २२ जुलै ते दि. २८ जुलै दरम्यान शिक्षण सप्ताह उपक्रम राबविण्यात आला. त्यानुसार,श्री.गोरक्ष शिक्षण सप्ताह तिथी भोजन शिक्षण सप्ताह डोंगराच्या पायथ्याशी निसर्गरम्य वातावरणात उत्साहपुर्वक साजरा

# गंगापूर शहरातील बांधकाम कामगारांना गृह उपयोगी वस्तू संचाचे वितरण

## आ. प्रशांत बंब यांच्या प्रयत्नातून गंगापूरला ६०० तर लासूरला १००० कामगारांना प्रत्यक्ष लाभ

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१ आगस्ट : गंगापूर शहरातील बांधकाम कामगारांना गृह उपयोगी वस्तू संचाचे वितरण आमदार प्रशांत बंब यांच्या प्रयत्नातून गंगापूरला ६०० तर लासूरला १००० कामगारांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आला. गंगापूर येथील शिवकृपा मंगल कार्यालय व लासुर येथील गीताबन येथे बांधकाम कामगारांना संसार उपयोगी भांडे वस्तूंचे वितरण बुधवारी करण्यात आले. या योजनेसाठी बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आलेली होती व यापुढेही तसेच यापुढे ही योजने करिता नोंदणी सुरू असून आमदार प्रशांत बंब यांचे संपर्क कार्यालय गंगापूर लासुर खुलताबाद या ठिकाणी संपर्क करण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे. त्यामुळे कोणताही बांधकाम कामगार या योजने पासून वंचित राहणार नाही





असे आवाहन यावेळी आमदार प्रशांत बंब यांनी केले आहे.

बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी अनेक योजना राबविल्या जातात या योजनेची सुरुवात राज्यात प्रथम गंगापूर खुलताबाद तालुक्यातून सुरूवात झाली.आता संपूर्ण राज्यात सुरु आहे.सुरूवातीला पाच हजार रुपये रोख देण्यात आले.त्यानंतर बांधकाम कामगारांना साहित्य वाटप करण्यात आले.आता शासनाने संसार उपयोगी भांडी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्यात सगळ्यात जास्त निधी मतदार संघात आमदार

**प्रत्येक गावातील शिक्षकांना मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे. परंतु अनेक शिक्षक हे मुख्यालय न राहता अपडाऊन करतात त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी २०२५ ते २०२७ पर्यंत शाळेच्या गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.**

**– आ. प्रशांत बंब, गंगापूर खुलताबाद मतदार संघ.**

प्रशांत बंब यांनी आणलाय लखमापूर ते सुलतानाबाद जलजीवन योजना तालुक्यातील नागरीकांच्या उपयोगी पडणार आहे.त्याचे काम प्रगतीपथावर आहे. पुढे ते म्हणाले की, आपली आजीच्या इच्छेनुसार तिर्थक्षेत्र यात्रा

घडवून आणि पोटभर अन्नदान करणे यापेक्षा कोणताही मोठा आनंदाचा क्षण नाही. यासाठी वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिक यांना आनंदाचा क्षण अनुभवता यावा यासाठी मतदारसंघात अष्टविनायक यात्रा दर्शन यात्रा घडविले.बिहार मधील बौद्ध गयाला संपूर्ण रेल्वे भरुन नेले.मुस्लीम बांधवांना अजमेरला संपूर्ण रेल्वे भरुन नेण्यात आली. दोन वर्षापासून तीर्थयात्रा दर्शन उपक्रम सुरूच आहे असे आमदार प्रशांत बंब म्हणाले यावेळी उपस्थितांनी अनुभव व्यक्त केले. अनेकांनी यावेळी आमदार प्रशांत बंब यांचे आभार मानले.

यावेळी पुढे बोलताना आमदार क्षणभर म्हणाले की जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी चांगली गुणवत्तेचे शिक्षण विद्यार्थ्यांना देणे अपेक्षित असून ज्या ठिकाणी शाळा आहे त्या ठिकाणी त्याच गावात राहणे बंधनकारक आहे तरीही अनेक शिक्षक मुख्यालय राहत नाहीत त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे यापुढील काळात २०२५ ते २०२७ पर्यंत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे यासाठी मतदारसंघात भरीव काम करण्यात येणार आहे. ज्या गावात शिक्षक राहणार नाहीत अशा गावातून लेखी तक्रारी करण्यात याव्यात असे आवाहनही यावेळी बंब यांनी केले.

यावेळी गंगापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब पदार कृषी उत्पन्न बाजार समिती लासुरचे शेषराव नाना जाधव नंदकुमार गांधीले रामेश्वर मुंदडा भाजपाचे तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण जिल्हा सरचिटणीसअशोक मंत्री अविनाश गायकवाड शहराध्यक्ष मारुती खैरे नगरसेवक प्रदीप पाटील दिपक साळवे प्रशांत मुळे अमोल जाधव राजेंद्र राठोड कृष्णकांत व्यवहारे अतुल रासकर गोपाल वर्मा उपस्थित होते. कार्यक्रमासाठी लाभार्थ्यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर प्रगटण

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेव, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ३०९/२०२४

अर्जदार : १) यशोदा भ. नरहरी सानप, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. सिनगाव जहागिर ता. देऊळगाव राजा जि. युलढाणा ह.मु. रांजणगाव शे.पु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) प्रदीप नरहरी सानप, वय ४१ वर्षे, धंदा मजुरी, रा. रांजणगाव शे.पु ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) उज्वला भ्र. संदिप सानप, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम रा रांजणगाव शे.पु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) तुषार पि. संदिप सानप, वय २१ वर्षे, धंदा शिक्षण रा रांजणगाव शे.पु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) तेजस पि. संदिप सानप, वय १९ वर्षे, धंदा शिक्षण रा रांजणगाव शे.पु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ५ यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. अमोल पी. ठाकुर यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ आई असुन अर्जदार क्र.३ ची सासु व अर्जदार क्र.४ व ५ यांची आजी (वडीलांची आई) आहे. तसेच अर्जदार क.३ ही अर्जदार क्र.१ चा मयत मुलगा संदिप यांची पत्नी असुन अर्जदार क्र.४ व ५ हे मयत संदिप यांचे मुले आहेत. अर्जदार क्र.१ चे पति, अर्जदार क्र.२ चे वडील, अर्जदार क्र.३ चे सासरे व अर्जदार क्र.४ व ५ यांचे आजोवा (वडीलांचे वडील) नामे नरहरी श्रीधर सानप हे दिनांक २४/०१/२०१६ रोजी मौजे सिनगाव ता. देउळगाव राजा येथे आजारपणामुळे मयत झाले आहे. तसेच अर्जदार क्र.१ व मयत नरहरी श्रीधर सानप यांना दोन मुले अर्जदार क्र.१ व संदिप नरहरी सानप हे होते त्यापैकी संदिप नरहरी सानप हे दिनांक ०२/०९/२०१८ रोजी मयत झाले असुन त्यांना अर्जदार क्र.१ आई, अर्जदार क्र.३ पत्नी व अर्जदार क्र.४ व ५ हे मुले असे वारसदार आहे. मयत नरहरी श्रीधर सानप यांना अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ हा मुलगा, अर्जदार क्र.३ ही सुन व अर्जदार क्र.४ व ५ हे नातु असे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्याशिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केलेला आहे.


त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०१ /०८/२०२४ रोजी दिले.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक                सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय गंगापुर

# गुत्तेदार भास्कर दानवेंच्या नियोजनामुळेच भाजपाच्या जालना जिल्ह्यातील २५ वर्षाच्या सत्तेला लागला सुरूंग!

## पक्षाने लोकसभेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी नव्या चेहऱ्यांना संधी देण्याची गरज!

तभा वृत्तसेवा
जालना । सुरेश कवडे पाटील



गेल्या २५ वर्षापासुन जालना लोकसभा मतदार संघावर भाजपाचे आपले एकहाती वर्चस्व रावसाहेब दानवेंच्या रूपाने होते, परंतु गेल्या काही महिन्यात रावसाहेब दानवे यांनी जालना जिह्यातील नियोजन कार्यकर्त्यांकडे न देता आपले बंधु गुत्तेदार भास्कर दानवे यांच्याकडे दिले होते. गुत्तेदार भास्कर दानवे यांनी जिल्ह्यातील नागरीकांसोबतच कार्यकर्त्यांना आपल्या सत्तेची मस्ती दाखविल्यामुळे गेल्या अनेक महिन्यापासुन येथील जनता तसेच भाजपाचे निष्ठावंत कार्यकर्ते त्यांच्या कार्यपध्दतीवर नाराज होती, याची वेळीच दखल जर माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवे यांनी घेतली असती तर कदाचित आज पुन्हा एकदा भारताच्या केंद्रीय मंत्रीमंडळात त्यांचे स्थान राहिले असते परंतु याकडे दुर्लक्ष केल्यामुळेच जनतेनी त्यांना घरी बसविले. लोकसभेत झालेल्या पराभवाची पुर्नरावृत्ती आगामी होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत टाळण्याची असेल तर जिल्ह्यात स्वत:जातीने लक्ष घालुन सर्वसामान्यांची जनहिताची कामे करून आपल्या गुत्तेदार असलेल्या भावाची मस्ती करून सामान्य कार्यकर्त्यांना संधी देण्याची गरज असल्याचे कार्यकर्त्यांमध्ये छुप्या बैठकीत व्यक्त होतांना दिसत आहे.



गुत्तेदार भास्कर दानवे

राज्यात येणाऱ्या २-३ महिन्यात विधानसभेचा निवडणुका लागण्याची दाट शक्यता आहे. याच पार्श्वभुमीवर जिल्ह्यात सर्वच पक्ष आ-पआपल्या परीने आपला गड राखण्यासाठी लोकहिताच्या कामांचा देखावा करून नागरीकांना आकर्षीत करतांना दिसत आहे. मात्र २५ वर्षापासुन जिल्ह्यावर सत्ता असलेली भाजपा मात्र कुठेही प्रचारसाठी आग्रही अथवा कोणतेही जनहिताची कामे करण्यात कुठेही दिसत नाही, कार्यकर्त्यांमध्ये आलेली उतरती कळा आणि पक्षातील वरिष्ठ नेते, पक्षाचे पक्षनिरीक्षक यांचे जिल्ह्यात कुठल्याही मतदार संघात लक्ष नसल्यामुळे गेल्या दोन महिन्यापासुन कार्यकर्त्यांनी इतर पक्षात पक्षातंर करतांना दिसून येत आहे. याकडे पक्षातील कोणताही नेता अथवा पदाधिकारी गांभीर्याने लक्ष देत नाही, त्यामुळे लोकसभेला जी पक्षाची अवस्था झाली तिच अवस्था विधानसभेला झाली तर नवल नको वाटायला. माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवे यांनी पक्षातील इतर कार्यकर्त्यांनी संधी देऊन पुढे करण्याची गरज असतांना देखील आपले बंधु असलेले गुत्तेदार भास्कर दानवे यांच्याकडेच नियोजन दिल्यामुळे येणाऱ्या विधानसभेला जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीला मोठा फटका बसणार यात तिळमात्र शंका नाही.

### लोकहितांच्या कामांमुळे जिल्ह्यात अर्जुनराव खोतकरांचा प्रभाव वाढला



“ जालना जिल्ह्यात विधानसभेचे वारे वाहु लागले असुन जिल्ह्यातील प्रत्येक मतदार संघात आपआपल्या परीने लोकहिताचे काम करू लागले आहेत, यात जिल्ह्यात अर्जुनराव खोतकर हे स्वत:जनतेत मिळून मिसळून जनहिताचे कामे जागच्या जागेवर मार्गी लावत असल्यामुळे जनतेत सध्या तरी अर्जुनराव खोतकर प्रभाव वाढला आहे, त्यात भरीस भर महणजे अर्जुनराव खोतकर यांचे सुपूत्र अभिमन्यु खोतकर हे जिल्ह्यातील युवकांचे कामे करण्यात सर्वात पुढे असल्यामुळे त्यांची क्रेझ पाहता येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत नक्कीच याचा फायदा होणार आहे

## संक्षिप्त

### देऊळझरी येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा
जाफराबाद/प्रतिनिधी

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती देऊळझरी ग्रामपंचायत येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी सामाजिक कार्यकर्ते संतोष पाटील भोपळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला यावेळी सरपंच सुभाष पाटील भोपळे ग्रामपंचायत सदस्य गजानन राऊत समाधान खिल्लारे आरिफ शहा लक्ष्मण भोपळे भागवत काकडे सुदाम भोपळे श्रीरंग साळवे केशव भोपळे जनार्दन भालेकर संतोष इंगळे नंदू साळवे अमोल भोपळे लक्ष्मण बकाल योगेश खंडागळे सचिन खंडागळे संतोष भोपळे पांडुरंग भोपळे गुलाबराव भाबळे नाशेर टेलरसह गावातील नागरिक उपस्थित होते

### भगवान माथेले यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेत महाराष्ट्र शासनाने जालना जिल्ह्यात ६,९४३ घरकुले मंजूर केली. या योजनेसाठी पाठपुरावा केल्याबद्दल धनगर समाज संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष भगवान माथेले यांचा अहिल्यादेवी होळकर स्मारक समिती आणि व्याख्यानमालेच्या वतीने सत्कार करण्यात आला.या प्रसंगी मुख्याध्यापक बालासाहेब आबुज, सरपंच प्रल्हाद नेमाने , सौरव भिसे , गणेश बकान ,ज्ञानेश्वर भुसारे ,संतोष लव्हटे आदींची उपस्थिती होती.

### पारध येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या विचारांची जयंती साजरी



तभा वृत्तसेवा
पारध/प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील पारध बु येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. येथील अण्णाभाऊ साठे भवन परिसरात जनता विद्यालयाचे सचिव उदयसिंह लोखंडे यांच्या हस्ते झेंडा वंदन करण्यात आले तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन आलेले मान्यवर तसेच समाज बांधवांच्या हस्ते करण्यात येऊन पुष्पहार अर्पण करण्यात आले तसेच त्यांना जयंती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात प्रा. संग्राम देशमुख, प्रल्हाद सुरडकर, कैलास ढमाले, गणेश दांडगे, साहेब अली आदी मान्यवरांनी अण्णा भाऊ साठेंचे विचार मांडून समाज प्रबोधन केले. तर शाहीर सुभाष सुरडकर यांनी आपल्या शैलीत अण्णाभाऊंच्या विचारांवर गीत गाऊन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी ग्रामविकास अधिकारी संजय पुरी, जनता विद्यालयाचे सचिव उदयसिंह लोखंडे, प्रा. संग्राम देशमुख, प्रा.डा. राज-राम डोईफोडे, प्रल्हाद सुरडकर, सलीम खान, कैलास ढमाले, भास्कर सरोदे, ग्रा. पं. सदस्य बाबुराव काकफळे,बाबा खान, तसेच शिक्षक विवेक अवसरमोल व मोईन शेख, साहेब अली, अशोक सुरडकर, शाम देशमुख, नदीम पठाण पत्रकार हरी बोर्हाडे, रामसिंग ठाकुर, गंगाधर अंबेकर, सागर देशमुख, शकील अहेमद, कृष्णा लोखंडे, तेजराव दांडगे तसेच समाजबांधव अनिल दांडगे, अशोक सुरडकर, दिनेश सुरडकर, संदिप दांडगे, दयानंद दांडगे, पप्पु दांडगे, सुनिल दांडगे, उत्तम साळवे, रमेश बोरकर, कैलास दांडगे, दिनकर सुराशे, साहेबराव दांडगे, मुरलीधर मानकर, पुंडलिक दांडगे, सांडु दांडगे, सचिन दांडगे आदीसह जयंती उत्सव समितीतील पदाधिकारी दिपक दांडगे, शाम दांडगे, महादु दांडगे, विनोद सुराशे, सुनिल दांडगे, अजय दांडगे, सोनु कांबळे, सागर दांडगे, कृष्णा दांडगे, रोहन दांडगे, अनिल दांडगे, रवि बोरकर, सुशिल दांडगे, शशिकांत दांडगे, प्रमोद दांडगे, गजानन साळवे, कृष्णा दांडगे आदी उपस्थित होते.

## शाळेची बस अडकली रस्त्यावरील पाण्याच्या खड्यात!

तभा वृत्तसेवा
मंठा/नागेश कुलकर्णी



तळणी ते वाघाळा रस्त्यावर शाळेय विद्यार्थ्यांच्या गाड्या ह्या पाणी असलेल्या खड्यात अडकल्या होत्या. विद्यार्थ्यांनी त्या गाड्या गुडघाभर पाण्यात लोटून बाहेर काढल्या.ही घटना गुरुवार (ता.१ ) रोजी तळणी ते वाघाळा रस्त्यावर टाकळखोपा गावात सकाळी साडे नऊ वाजेच्या दरम्यान घडली.मंठा तालुक्यात तळणी सर्कल मधील इंचा टाकळखोपा ,वाघाळा रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत.त्या खड्डयात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. त्यामुळे शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. गुरुव-ारी सकाळी तीन ते चार गाड्या मधुन तीस पस्तीस विद्यार्थी शाळेसाठी निघाले होते.परंतु विद्यार्थ्यांची वाहने रस्त्यात बंद पडली. त्यामुळे विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मिळून ही बंद पडलेली वाहने लोटत खड्डया बाहेर काढली.काही विद्यार्थ्यांची घटक चाचणी परीक्षा देखील होती. शेगाव ते पंढरपुर दिंडी महामार्गावर पुर्णा पाटीवरून तळणी ते वाघाळा जाण्यासाठी रस्ता आहे. हे अंतर सहा ते सात किलोमीटर आहे परंतू या मार्गावर भले मोठ मोठे खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी गुडघाभर खोल खड्डे पडले आहेत. त्यामुळे ह्या मार्गावरून जाण्यासाठी या परिसरातील गामस्थांना , विद्यार्थ्यांना तसेच बाहेर गावावरून येणाऱ्या पाहुण्यांना खुप त्रास सहन करावा लागतो.खराब रस्त्यामुळे या मार्गावरून एस टी देखील जात नाही .

## माझी बहीण लाडकी योजनेचे लाभार्थ्यांनी भरलेले झेरॉक्स फार्म ही होणार पात्र -आ.बबनराव लोणीकर

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी



मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेचा अर्ज ऑनलाइन करताना मूळ ओरिजनल आधार कार्ड, मतदान कार्ड, रेशन कार्ड, बँकेचे पासबुक, शाळेची टीसी, रहिवासी दाखला, जन्माचे प्रमाणपत्र ही कागदपत्र ओरिजनल कलर फोटो कॅमेऱ्याद्वारे काढूनच फॉर्म भरावे अशी अट या योजनेत होती. परंतु घाई गडबडीत अंगणवाडी सेविकांनी ऑफलाइन पद्धतीने मूळ कागदपत्रांच्या झेरॉक्स अपलोड करत फॉर्म ऑनलाईन केले. फॉर्म भरत असताना महिलेचे नाव आधार कार्डवर इंग्रजी भाषेत आहे तसेच टाईप करणे आवश्यक होते. मराठीत लिहिलेले नाव अनेक बँकांच्या सॉफ्टवेअर मध्ये न दिसल्याने फार्म रिजेक्ट होण्याची भीती होती. परतूर विधानसभा मतदारसंघातील अनेक महिलांनी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांना भेटून याबाबतीत शंका उपस्थित केल्याने आमदार बबनराव लोणीकर यांनी तातडीने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा करून चुकलेले फॉर्म दुरुस्त करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. ऑनलाइन करताना वापरलेल्या झेरॉक्स प्रति ग्राह्य धरण्यात याव्यात. आणि फॉर्म भरताना मराठी भाषेत भरलेले फार्म रिजेक्ट करण्यात येऊ नयेत अशा तीन प्रकारच्या मागण्या केल्या असता. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आमदार लोणीकर यांच्या विनंतीला मान देऊन तातडीने याबाबतीत सुधारित प्रशासकीय आदेश काढण्याचे कबूल केले आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे महाराष्ट्रातील अपात्र होणारे लाखो फार्म आता मात्र पात्र होतील. अर्ज ऑनलाईन करताना झालेल्या चुका सुधारण्याकरिता ऑनलाईन भरलेला फॉर्म दुरुस्ती करण्याचे सुद्धा ऑप्शन यामध्ये देण्यात येईल असे आश्वासन देखील महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिले आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी परतूर विधानसभा मतदारसंघात एकही महिला लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू नये. याकरिता मंठा परतूर आणि सेवली येथे महिला मेळाव्याचे आयोजन करून त्याच ठिकाणी महिलांचे फॉर्म भरण्याची सुविधा निर्माण केली होती. त्या महिला मेळाव्यास परतूर येथे सुमारे सहा हजार महिला उपस्थित होत्या तर मंठा येथे सुमारे पाच हजार तर सेवली येथे एक हजार महिला उपस्थित होत्या. या तिन्ही महिला मेळाव्यात १४,००० हून अधिक फॉर्म ऑनलाईन भरून घेण्यात आले आहे.

## भोकरदन-जाफ्राबाद मतदारसंघातील यादीमध्ये अवैध नावे? तीव्र आंदोलन करण्यात येईल -राजाभाऊ देशमुख

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी



भोकरदन- जाफ्राबाद विधान सभेच्या मतदारयादीत बदनापूर मतदार संघातील मतदारांचे नावे अवैध रित्या काही पक्षाचे पदाधिकारी समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याबद्दल अनेक नागरिकांनी माझ्याकडे तक्रार केली असून मी याबद्दल मा तह-सीलदार भोकरदन येथे लेखी तक्रार केली असून यावर संबंधित विभागाने हे अवैध समाविष्ट नावे कमी केले नाही तर जालना जिल्हा काँग्रेस कमिटीकडुन तीव्र आंदोलन करण्यात येईल असे राजाभाऊ देशमुख यांनी मा तह-सीलदार यांना दिलेल्या लेखी तक्रारीत म्हणाले.

या पुर्वी भोकरदन शहरातील मतदान यादीत बदनापूर मतदार संघातील बोगस अवैध मतदारांचे नावे समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला होता परंतु आम्ही वेळेवर आक्षेप घेऊन योग्य तो पुरावा सादर केल्यामुळेच बरीचशी अवैध नावे त्यावेळी कमी करण्यात आम्हाला यश आले

आम्ही दिलेल्या तक्रारीची दखल निवडणूक विभागाने घेतली नाही तर जालना काँग्रेसकडून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देशमुख यांनी मा तहसीलदार यांना दिलेल्या लेखी तक्रारीत दिला आहे

## रोहणवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शाखेचे उद्घाटन





तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना तालुक्यातील रोहनवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्घाटन, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण तसेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे फार्म वितरण राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी रोहनवाडी येथे भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आली.यावेळी जिल्हा उपाध्यक्ष आण्णासाहेब चित्तेकर, जिल्हा कार्याध्यक्ष मिर्जा अनवर बेग, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष शिवचरण बाळराज, युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे, विधानसभा अध्यक्ष प्रतापराव शिंदे, तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे, प्रदेश संघटक रमेश मुळे, भटक्या जमाती जिल्हाध्यक्ष विजय सोन-वणे, अँड. शेखर पाटील, रायुकाँचे शहराध्यक्ष वैभव नाले-गावकर, सामाजिक न्याय विभाग शहर जिल्हाध्यक्ष सतिश वाहूळे, अमोल खरात, सलमान भाई, पप्पू भाई, सचिन इरछे, राहुल लष्कर, विलास भावले,आरेफ,भाई,इमान मनियार, चेअरमन सुभाष मोरे, माजी उपसरपंच गंगाराम मैद, सिद्धू शिंदे, सागर ठाकूर,विठ्ठल सातपुते,संतोष मुंडे,ज्ञानदेव मैद,रामेश्वर तनपुरे, संजय भालेराव, लक्ष्मण खांडेभराड, यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी रोहनवाडी येथील १५० युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये त्यात धीरज बाळराज, किशोर मैद, शंकर मैद, भाऊसाहेब सुरासे ,भरत मस्के, शरद मस्के, प्रतिक भालेराव, करण शिंगणे शुभम शिंगणे ,सिद-्शवर बाळराज विशाल बाळराज , लक्ष्मण खांडेभराड, प्रल्हाद नागवे, सौरभ गायकवाड,जितेश गायकवाड, सागर नवगिरे, संतोष मस्के, पांडुरंग मैद, बालू बाळराज, शिवाजी मैद, भारत मस्के सुमित पाडमुख, कार्तिक कुटे, रामेश्वर कुटे,शुभम चावरे विशाल चावरे प्रेम लहाने यांनी यावेळी माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष मा. अरविंद चव्हाण यांच्यावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केले.

### उप-निबंधक, सहकारी संस्था (परसेवा)

**मराठवाडा अर्बन बॅक्स् को-ऑप.असोसिएशन लि., छत्रपती संभाजी नगर**
**अर्बन बँक भवन, प्लॉट नं. २७, विकासपुरी, चिनार गार्डन जवळ, पडेगांव, छत्रपती संभाजी नगर, ४३१००२**

**जाहिर नोटीस**

अर्जदार बँक : जनकल्याण अर्बन को ऑफ बैंक लि.कळंब
मुख्य कार्यालय : कळंब
जा.क्रं. जा.नो.१०१/६३/२०२४-२५

**विरूध्द**
**जाब देणार**

| अ.क्रं. | दावा क्रं. | कर्जदाराचे नाव | जामीनदाराचे नाव | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ३४१/२०२४-२५ | मयुर मधुकर वट्टमवार रा.गणेश टेक्सटाईल्स शिवाजी चौक, मोढा रोड, उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर | सौ. कृष्णाबाई अनिल वट्टमवार रा.खाणगा गल्ली, रावीकर निवास उदगीर ता.उदगीर जि.लातूर | ८६८९७१/- |
| २ | ३४२/२०२४-२५ | मयुर मधुकर वट्टमवार रा.गणेश टेक्सटाईल्स शिवाजी चौक, मोढा रोड, उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर | सौ. कृष्णाबाई अनिल वट्टमवार रा.खाणगा गल्ली, रावीकर निवास उदगीर ता.उदगीर जि.लातूर | ३४५३१६/- |
| ३ | ३४३/२०२४-२५ | प्रदिप विठ्ठलराव जाधव, मु.पो. तोंडचिर ता.उदगीर जि. लातूर | ज्ञानोबा विपीन जाधव मु.पो. तोंडचिर उदगीर जि.लातूर संतोष प्रेमचंद बोदनकर मु.पो. तोंडचिर उदगीर जि.लातूर | ७६१५०/- |
| ४ | ३४४/२०२४-२५ | राहुल भगवंत कवडे , मु.पो.कन्हेरवाडी ता.कळंब जि. धाराशिव | सुरेंद्र बळीराम तांबारे राजेंद्र बळीराम तांबारे मु.पो.आंदोरा ता.कळंब | ४७००७५/- |
| ५ | ३४५/२०२४-२५ | महेश महादेव धायगुडे स्वराज ट्रेडर्स शारदा नगर, परळी वै. ता.परळी जि.बीड | महादेव रंगनाथ धायगुडे मिलींद विद्यालय, गणेश पार रोड परळी वै. ता.परळी जि.बीड ज्ञानेश्वर अकुंश राऊत, पटाईत गल्ली अंबाजोगाई | ७०७४३६/- |
| ६ | ३४६/२०२४-२५ | महादेव रंगनाथ धायगुडे मिलींद विद्यालय, गणेश पार रोड परळी वै. ता.परळी जि.बीड | -- | १४४७७०/- |
| ७ | ३४७/२०२४-२५ | धनराज व्यंकट सोनवणे रा. बोधी घाट, आंबेडकर चौक अंबाजोगाई | अंतिम सुर्यकांत बनसोडे रा. बोधी घाट, आंबेडकर चौक अंबाजोगाई | ११६१६९/- |

सदर दाव्याच्या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रतिवादीना अर्जातील रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहेत. परंतु प्रतिवादींना समन्स रूजू न झाल्याने व त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहिर समन्स देत आहोत. उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यांसाठी स्वतः जातीने दिनांक २१/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यांसंबंधी कागदपत्रासह आपण या न्यायालयात हजर राहवे. या नोटीसीद्वारे प्रतिवादींना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. म्हणून आज दिनांक ३१/०७/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहिर समन्स दिला आहे.

**सुनावणीचे ठिकाण**

**उपनिबंधक सहकारी संस्था ( परसेवा ) मराठवाडा अर्बन बॅक्स् को.ऑपरेटीव्ह असोसिएशन लि.अर्बन बँक भवन, प्लॉट क्र २७ विकासपुरी चिनार गार्डन जवळ, पडेगांव, छत्रपती संभाजी नगर उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा) मराठवाडा अर्बन बँक्स को. ऑप. असो. लि., छत्रपती संभाजी नगर**

## अग्रलेख...

# ‘लव्ह जिहाद’च्या माथ्यावर प्रहार

‘लव्ह जिहाद’ची प्रकरणे दिवसेंदिवस वाढतच जाताना दिसत आहेत. देशातील एकाही राज्याला, शहराला आणि गाव-खेड्याला या समस्येपासून मुक्ती नाही. परधर्मीय विशेषतः मुस्लिम तरुण हिंदू, ख्रिस्ती, बौद्ध, जैन, पारशी तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे धर्मांतरण करीत आहेत. विशेष म्हणजे लग्नानंतर आणि तत्पूर्वीही त्यांच्या आयुष्याशी जो खेळ होत आहे, त्यातून अनेक तरुणींच्या हत्या झाल्या आहेत. अनेकींवर अनन्वित अत्याचार होत आहेत. काहींनी त्रास असह्य झाल्याने आत्महत्या केल्या आहेत. या तरुणींना दहशतवादाच्याही मार्गी लावले जात आहे. हीच भयानक परिस्थिती ध्यानात घेऊन उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी लव्ह जिहादविरुद्ध कठोर कायदा तयार केला आहे. त्यानुसार अशा प्रकरणांमध्ये आरोपीला २० वर्षांच्या कारावासाची अथवा आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येणार आहे. या कठोर कायद्यामुळे तरुणींना नाव बदलून फसविण्याच्या प्रकारांना आळा बसणार असून भारताच्या सामाजिक आरोग्याची घडी नीट बसण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. हे विधेयक आणल्याबद्दल योगी आदित्यनाथ आणि त्यांचे सरकार अभिनंदनास पात्र आहे. सुरुवातीला या विधेयकात अशा प्रकरणांमध्ये १० वर्षांची शिक्षा आणि ५० हजार रुपये दंडाची तरतूद होती. सुधारित तरतुदीनुसार आता कोणतीही व्यक्ती धर्मांतर प्रकरणांमध्ये एफआयआर दाखल करू शकेल. यापूर्वी या प्रकरणाची माहिती किंवा तक्रार देण्यासाठी पीडितेचे आई-वडील, भावंडं यांची उपस्थिती आवश्यक होती; मात्र आता त्याची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. आता ही माहिती कोणीही पोलिसांना लेखी स्वरूपात देऊ शकेल. विरोधकांना आणि विशेषतः मुस्लिमांना लव्ह जिहाद नावाची संकल्पनाच मान्य नाही. त्यामुळे त्यांच्याकडून या विधेयकावर टीका झाली नसती तरच नवल. मुस्लिम समाजाला लक्ष्य करण्याकरिता हे विधेयक आणल्याची टीका धर्मांध नेत्यांकडून केली जात आहे; पण ही टीका अयोग्य आहे. नवा कायदा केवळ मुस्लिमांनाचा लागू होणार नसून सर्वच जाती-पंथांच्या लोकांसाठी यातील तरतुदी सारख्याच लागू होणार आहेत. २००९ साली अनेक नियतकालिकांमध्ये लव्ह जिहादबाबतच्या बातम्या प्रकाशित झाल्या होत्या. केरळ उच्च न्यायालयाच्या एका खंडपीठापुढे लव्ह जिहादबाबत एक याचिका दाखल करण्यात आली होती. केवळ चार वर्षांत केरळमध्ये चार हजारांहून अधिक लव्ह जिहादची प्रकरणे घडल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता. त्या याचिकेवर भाष्य करताना केरळ उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शशिधरन नंबियार यांनी यासंदर्भात दाखल झालेल्या प्रत्येक तक्रारीची पोलिसांनी सखोल चौकशी करावी, असे आदेश दिले होते. ख्रिस्ती समुदायातील मुलींनाही प्रेमाच्या जाळ्यात ओढून नंतर त्यांचे धर्मांतरण केले जात असल्याचे वृत्त अनेक नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले होते. पुढील काळात हा मुद्दा केवळ केरळ आणि कर्नाटकपुरता मर्यादित न राहता, त्याची व्याप्ती संपूर्ण भारत आणि युरोप, अमेरिकेपर्यंत पोहोचल्याचे निष्पन्न झाले. एका विशेष योजनेंतर्गत लव्ह जिहादची प्रकरणे घडवून आणली जात असून मुस्लिम तरुण-तरुणींना त्यासाठी मशिदींमधून पैसा मिळत असल्याच्या कट-कारस्थानाचाही खुलासा झाला. नव्या कायद्यानुसार उत्तर प्रदेशचे योगी सरकार राज्यात लव्ह जिहाद रोखण्याचा आणि प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार आहे. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीलाच योगी सरकारने एक विधेयक आणले आणि सरकार याबाबत खूप गंभीर असल्याचे स्पष्ट केले. मंगळवारी विधानसभेत उत्तरप्रदेश बेकायदेशीर धार्मिक धर्मांतर प्रतिबंध (दुरुस्ती) विधेयक सादर करून सरकारने सांगितले की, आता ‘लव्ह जिहाद’साठी जन्मठेपेची शिक्षा होईल. सुधारित विधेयकाने कायदा पूर्वीपेक्षा कठोर केला आहे आणि फसवणूक किंवा सक्तीने धर्मांतराच्या प्रकरणात जास्तीत जास्त जन्मठेप किंवा ५ लाख रुपयांच्या दंडाची तरतूद केली आहे. उत्तरप्रदेश सरकार महिलांच्या सुरक्षेबाबत खूप गंभीर असून या सरकारने सत्तेवर येताच अँटी रोमियो स्क्वॉड्स बनविले. त्यालादेखील समाजवादी पक्षाने सर्वात आधी विरोध केला. समाजवादी पक्षाशी संबंधित लोक महिलांवरील गुन्ह्यांच्या बहुतांश घटनांशी कोणत्या ना कोणत्या प्रकारे जोडलेले आहेत, याकडे योगींनी लक्ष वेधले आहे. ‘मुले आहेत, त्यांच्याकडून चुका होतात,’ अशी भूमिका घेणारे महिलांच्या सुरक्षेवर कसे बोलू शकतात? असा प्रश्न भाजपाने उपस्थित केला असून समाजवादी पक्षच महिलांच्या सुरक्षेला धोका आहे, असे ते सांगत आहेत.

सुधारित विधेयकात लव्ह जिहादच्या माध्यमातून महिलेची फसवणूक करून तिचे धर्मांतर करणे किंवा तिच्याशी बेकायदेशीरपणे विवाह करणे आणि तिचा छळ करणे अशा दोषींना जास्तीत जास्त जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद आहे. जबरदस्ती धर्मांतरण करण्यासाठी वित्तपुरवठा करणाऱ्यांनाही या कायद्याच्या कक्षेत घेण्यात आले आहे. धर्मांतरासाठी विदेशी निधी आल्याचे स्पष्ट झाल्यास दोषींना ७ ते १४ वर्षांची शिक्षा आणि कमीत कमी १० लाखांचा दंड ठोठावण्यात येईल. संसदीय कामकाज मंत्री सुरेश खन्ना यांनी सोमवारी पहिल्या दिवशी उत्तरप्रदेश बेकायदेशीर धार्मिक धर्मांतर प्रतिबंध (दुरुस्ती) कायदा, २०२४ सभागृहात मांडला होता. एखाद्या व्यक्तीने, एखाद्याचे धर्मांतर करण्याच्या उद्देशाने धमकावले, मारहाण केली, लग्न करण्याचे वचन दिले किंवा त्यासाठी कट रचला किंवा एखाद्या महिलेची, अल्पवयीन व्यक्तीची किंवा कोणाचीही तस्करी केली, तर त्याच्यावर सर्वात जास्त गुन्हा दाखल केला जाईल, असे प्रस्तावित करण्यात आले आहे.

लव्ह जिहाद ही समाजाला लागलेली कीड आहे. या अंतर्गत १५ ते २५ वर्षीय युवतींना लक्ष्य केले जाते. हा विषय जसा गुंतागुंतीचा आहे तसाच तो मनात भीती निर्माण करणाराही आहे. लव्ह जिहादसाठी एका विशिष्ट पद्धतीचा अवलंब केला जातो. ज्या मुली या प्रकाराला बळी पडतात, त्यांच्या आयुष्यात कसल्या ना कसल्या गोष्टींची कमतरता असते, ही बाब ध्यानात आली आहे. घरची आत्यंतिक गरिबी, आई अथवा वडिलांचा बाहेरख्यालीपणा, मुलींच्या व्यक्तिमत्त्वाची सातत्याने उपेक्षा केली जाणे, कौटुंबिक भांडणे, मुलींच्या मागण्यांची पूर्तता न करणे, स्वातंत्र्याचा अभाव, घरच्या लोकांपेक्षा बाहेरच्या लोकांवर जास्त विश्वास असणे, तडक-भडक जीवनशैलीचे आकर्षण, तारुण्याचा अर्थ म्हणजे केवळ मौज-मस्ती असे मानणारे मित्र-मैत्रिणी आणि १३ ते २१ वर्षापर्यंतचे परिस्थितीचे गांभीर्य न समजणारे वय ही काही महत्त्वाची कारणे लक्षात आलेली आहे. मुस्लिम तरुण मुलींना छोट्या-मोठ्या वस्तू भेट देऊन भुरळ घालतात, ही बाबही स्पष्ट झाली आहे. साधा गजरा आणून देणाऱ्या मुलाच्या प्रेमात मुली सहजासहजी पडलेल्या आहेत. कुणाला व्यक्तिमत्त्वाचे आकर्षण तर कुणाला हिरोसारखा दिसत असल्याने तो आवडलेला! अनेक मुली मित्रांच्या ग्रुपमध्येच लव्ह जिहादच्या शिकार झाल्या. त्यांच्याच मित्र-मैत्रिणींनी मुस्लिम युवकाशी त्यांची मैत्री करवून दिल्याचेही आढळून आले आहे. महागड्या वस्तूंची भेट देणे, महागड्या मोटारसायकली आणि चारचाकी वाहनांची मुलींना भुरळ पडलेली आहे. या साऱ्या प्रकरणांमध्ये एक बाब स्पष्ट झाली आहे की, बहुतांश मुस्लिम मुले कमी शिकलेली असतात आणि त्यातील कुणालाच ना नोकरी असते ना छोटा-मोठा व्यवसाय. बहुतांश मुले गॅरेजमध्ये काम करणारी, मोबाईल रिपेअरिंग करणारी अथवा मंदिराच्या शेजारी ताईत बांधणे, गंध लावणे, ज्योतिषादी कामे करणारी आढळून आली आहेत. विशेष म्हणजे ही मुले आपली मुस्लिम नावे लपवून मोनू, गोलू, पप्पू, टिपू, राजू, वीरू, बबली या नावाने वावरत असतात. दोन-चार महिन्यांतच ही मुले मुलींचा विश्वास संपादन करतात. यादरम्यान मुलाची ओळख उघड झाल्यास तो मुस्लिम धर्मातील रीतीरिवाजांवर टीका करून मोहजाळ उभे करतो. अनेक प्रकरणे लग्नापर्यंत पोहोचतात. पण त्यात प्रचंड छळ अनुभवायला येतो. मुस्लिम मुलांच्या आधीच तीन-चार बायका असल्याची बाब उघड होते. पण लग्नानंतर मुलीकडचेही तिला स्वीकारायला तयार नसतात आणि सासरच्यांचाही जाच असह्य होतो. याच लव्ह जिहादने सारा समाज हादरला असताना, योगींनी एक कठोर कायदा आणून त्याच्या बंदोबस्ताची एक दिशा निश्चित केली आहे. त्याच्या मस्तकावरच लत्ताप्रहार केला याहे. याचेच अनुकरण इतरही राज्यांनी करण्याची गरज आहे.

## इतस्ततः

### डॉ. विवेक राजे

# कावड यात्रेतच नव्हे, सर्व यात्रांमध्ये...!

उत्तरप्रदेश सरकारने जारी केलेला, कावड यात्रेच्या मार्गावरील सर्व दुकानमालकांनी आपले खरे नाव, परवान्याचा क्रमांक तसेच नोंदणी संबंधित माहिती सगळ्यांना दिसेल अशी ठळकपणे आपल्या दुकानाच्या पाटीवर लावावी, हा आदेश चर्चेत आहे. कावड यात्रेच्या मार्गावर असलेल्या असंख्य दुकानदारांचे आर्थिक गणितच मुळात कावड यात्री यात्रेच्या काळात जो काही खर्च करतात त्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. श्रावण महिन्यात गंगोत्री, हरिद्वार, हृषीकेश येथून गंगाजल कावडीत भरून पायी चालत, ज्योतिर्लिंगांपैकी एखाद्या शिवलिंगावर त्याचा अभिषेक करायचा, असे या यात्रेचे स्वरूप आहे. या यात्रेचे नियम अतिशय कडक आहेत. एक म्हणजे कोणत्याही परिस्थितीत गंगाजल भरलेली कावड जमिनीवर ठेवायची नाही. तशीच परिस्थिती असेल तर कावड एखाद्या झाडाच्या फांदीवर किंवा एखाद्या स्टँडवर ठेवायची सुविधा दिलेली आहे. मात्र, जमिनीवर कावड कदापी ठेवू नये. दुसरे म्हणजे यात्रेमध्ये संपूर्ण मार्गावर कोणत्याही मादक पदार्थांचे सेवन करायचे नाही. तिसरे म्हणजे यात्रेच्या काळात यात्रेकरूंनी शुद्ध, सात्त्विक व शाकाहारी भोजनच घ्यावयाचे आहे. यात्रेचे नियम पाहता योगी आदित्यनाथ यांच्या सरकारने जारी केलेले आदेश अत्यंत योग्य आहेत, असेच म्हणावे लागते. कावड यात्रेच्या या संपूर्ण मार्गावर मुस्लिम व्यावसायिकांनी हजारोंच्या संख्येने हॉटेल, धाबे, फळांच्या गाड्या, किराणा मालाची दुकाने किंवा या कावडियांना यात्रेच्या काळात लागणाऱ्या वस्तूंची दुकाने थाटलेली आहेत. मुस्लिम धर्मीयांमध्ये अस्तित्वात असलेल्या प्रथा किंवा पद्धती कावड यात्रेच्या नियमांचाच नव्हे, तर आरोग्य आणि हिंदू सात्त्विकतेचा भंग करणाऱ्या आहेत. त्यामुळे या मार्गावर आणि अन्यत्रही आपली खरी ओळख लपवून यात्रेकरू वा ग्राहकांना धोका देऊन व्यवसाय मिळविण्याचे हे मुस्लिम समाजाचे कारस्थान आहे. आज कोणत्याही प्रदेशात, कोणत्याही हायवेला आपली खरी ओळख दिसू नये अशा नावाने अनेक धाबे, दुकाने थाटलेली आहेत.

इथे मुस्लिम समाजाने एका महत्त्वाच्या बाबतीत स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. ते म्हणजे अन्न पदार्थ तयार करताना त्यात थुंकण्याची जी पद्धत आहे ती ते सोडून का देत नाहीत? खाद्य पदार्थात थुंकणे किंवा फळे, पाव जीभेने चाटून विक्रीसाठी ठेवणे हे कावडियांच्या किंवा हिंदूंच्या सात्त्विक, शुद्ध, आरोग्यदायी खाद्य पदार्थ मिळण्याच्या हक्काचा भंग करणारे आहे. या प्रथेचे मूळ इतिहास



संशोधक सत्येन वेलणकर यांच्या एक पोस्टनुसार (सहीह बुखारी, ४१०२) मध्ये सापडते. या हदिथचे संक्षिप्त वृत्त असे की, अल अझाबच्या युद्धाच्या वेळी मुहम्मद पैगंबर अनेक लोकांना बरोबर घेऊन खंदक खणत होते. तेव्हा जबिर बिन अब्दुला याला मुहम्मद भुकेला असल्याचे लक्षात आले. तो घरी जाऊन आपल्या बायकोला म्हणाला की, ‘पैगंबर भुकेले आहेत. त्यांच्यासाठी जेवण तयार करता येईल का?’ त्यावर त्यांच्या बायकोने एक पिशवीभर बार्ली धान्य आपल्याकडे असल्याचे त्याला दाखविले. जबिर तिला म्हणाला की, ‘आपल्याकडचे बकरीचे पिल्लू मी कापतो; तोपर्यंत तू याचे पीठ कर.’ त्याने त्या बकरीचे मांस कापून बायकोकडे दिले, तेव्हा ती जबिरला म्हणाली की, ‘पैगंबरासमोर मला अपमानित करू नकोस, हे साहित्य पुरेसे नाही.’ जबिर मुहम्मद पैगंबराकडे गेला व म्हणाला की, ‘जेवायला चला, पण मजकडे सगळ्यांना पुरेल इतके जेवण नाही.’ पैगंबर मात्र सगळ्या लोकांना बोलावून स्वतः पुढे आला. जे बार्लीचे पीठ होते त्यात थुंकला; मग शिजत ठेवलेल्या मांसाच्या भांड्यातही थुंकला आणि म्हणाला की, ‘आता रोट्या करा आणि सगळेजण जेऊन जात नाहीत तोपर्यंत हे मांसाचे भांडे चुलीवरून खाली काढू नका.’ (अशा प्रकारच्या अजूनही काही हदिथ आहेत.) सगळे लोक म्हणजे अंदाजे हजार माणसे जेवून गेली, पण रोट्यांची कणीक संपली नाही की भांड्यातील मांसाची शीग उतरली नाही. सगळ्यांना ते अन्न पुरून उरले.

इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, इस्लाममध्ये आजही पैगंबरांच्या पावलावर पाऊल टाकून चालणे म्हणजे ‘नबी कि सुनत पर अमल करना’ बंधनकारक आहे. हदिस जे जे सांगते ते ते करणे म्हणजेच मुसलमान बनून राहणे असते. कारण पैगंबराचे अनुकरण न करणे म्हणजे अश्रद्ध होणे; म्हणजेच गैरमुस्लिम होणे होय. कदाचित याच कारणामुळे आजवर या थुंकण्याविषयी गदारोळ माजूनही कोणत्याही मुस्लिम संघटनेने हे थुंकणे किंवा चाटणे नाकारलेले नाही. अन्नात थुंकणे किंवा पाव, फळं चाटून मगच त्याची विक्री करणे, हा इस्लामिक श्रद्धेचा विषय असेल तर सात्त्विक, शाकाहारी, आरोग्यदायी भोजन ही हिंदूंची श्रद्धा होय. तसेच मिळणाऱ्या सेवा वा खाद्य पदार्थ हे आमच्या धार्मिक श्रद्धांच्या अनुसार व आरोग्यदायीच मिळावेत हा हिंदूचा अधिकारदेखील होय. त्यामुळे उत्तरप्रदेश सरकारचा आदेश कोणत्याही तर्काच्या वा कायद्याच्या आधारावर गैरलागू होत नाही. या सर्व प्रकरणात विरोधी पक्ष अनावश्यक राजकारण करताना दिसून येतात. या आदेशामुळे आणि सर्वोच्च न्यायालयाने त्या आदेशाला दिलेल्या स्थगितीमुळे, इस्लामिक इको सिस्टिम, हलाल अर्थव्यवस्था आणि हिंदूंच्या धार्मिक भावना तसेच धर्मश्रद्धा यांना सातत्याने ठेच पोहोचविण्याची इस्लामिक समाज, देशातील व्यवस्था आणि सध्याच्या विरोधी पक्षांची मानसिकता अत्यंत ठळकपणे समोर आलेली आहे. मुस्लिम समाज अशा प्रथा-परंपरांचा आग्रही असेल तर हिंदूंनी आपल्या प्रथा-परंपरांचा आक्रमक आग्रह धरणे योग्यच ठरते. हिंदू जितके कोणत्याही बाबतीत सामोपचाराने वागतील किंवा माघार घेतील तितके अधिक चेपले जातील, हे जाणून आक्रमक संघर्षाचा पवित्रा घेण्याची वेळ आलेली आहे. हिंदूंच्या भारतभर पसरलेल्या तीर्थक्षेत्र व यात्रांमध्ये अमरनाथ यात्रा, चारधाम यात्रा तसेच वैष्णोदेवी यात्रा यांना विशेष महत्त्व आहे. या तीनही यात्रा आज इस्लामच्या मगरमिठीत सापडल्या आहेत. या यात्रांमधील सर्व ठिकाणी घोडेवाले, पालखीवाले, पिठ्ठूवाले तसेच राहण्यासाठी तंबू भाड्याने देणारे हे सर्व ९९ टक्के मुस्लिम आहेत. अमरनाथ यात्रेत सर्व लंगर मात्र हिंदू सेवाभावी संस्थांचे असणे हा एकच अपवाद. इस्लामला दिलेल्या अल्पसंख्यक दर्जाचे सर्व फायदे लुटायचे. आपली लोकसंख्या सतत वाढवत राहायची. सरकारी जमिनींवर अतिक्रमण करून त्या मुसलमानांच्या ताब्यात घ्यायच्या. स्वतःची ओळख लपवून हे सगळे छुपेपणाने करायचे. यालाच ‘गजवा एक हिंद’ म्हणतात. इतर धर्मीयांशी सतत खोटी बतावणी करीत त्यांना बेसावध ठेवून त्यांचा घात करायचा याला ‘अल-तकिया’ म्हणतात. या सर्व प्रकारे सगळ्या प्रदेशात इस्लामिक कायदे, शरिया लागू करायचा याला ‘दार-उल-इस्लाम’ म्हणतात. तूर्तास दुकानातील देवी-देवतांचे फोटो, त्यांची नियमित होत असलेली पूजा, ऑनलाईन पेमेंटसाठी ठेवलेले क्यू आर कोड यावरून दुकान मालकांची नीट तपासणी करूनच वस्तू, सेवा, खाद्य पदार्थ घ्यावेत किंवा कोणत्याही हॉटेल वा धाब्यावर जेवण्याआधी मालक आणि कामगार कोण याची शहानिशा करूनच फक्त हिंदू खानावळीत वा धाब्यावर जेवण घ्यावे, हेच उत्तम.

९८८१२४२२२४

## वेध

### नंदकिशोर काथवटे

# सलाम ‘सी-६०’

नक्षलविरोधी अभियानासाठी गडचिरोली पोलिस दलांतर्गत कार्यरत ‘सी-६०’ पोलिस फोर्सला खरंच सलाम केला पाहिजे. १९९० मध्ये केवळ ६० पोलिस जवानांचे नक्षल्यांविरुद्ध लढण्याकरिता विशेष पोलिस दल तयार करण्यात आले. या पोलिस दलाला नंतर ‘सी-६०’ नावाने ओळखले जाऊ लागले. गडचिरोली जिल्ह्यातील नक्षल कारवायांना थोपवून धरण्यात आणि नक्षल्यांचा खात्मा करण्यात सर्वात मोठे योगदान जर कुणाचे असेल तर ते म्हणजे सी-६० फोर्सचे आहे. गडचिरोलीतील स्थानिक स्तरावर प्रशिक्षित झालेले सी-६० फोर्स आता नक्षल्यांसाठी कर्दनकाळ ठरले आहे. एका सी-६० पार्टीत ३० पोलिस जवानांचा समावेश असतो. अशा एकूण २९ सी-६० पोलिस पार्ट्या नक्षलविरोधी अभियानासाठी तैनात आहेत. जवळपास १ हजार जवान या सी-६० विशेष पोलिस दलात नक्षल चळवळीविरुद्धच्या लढाईत स्वतःचा जीव धोक्यात घालून कार्यरत आहेत. सी-६० पोलिस फोर्सच्या उपलब्धीकडे प्रकाश टाकल्यास सर्वात मोठे यश २०१८ मध्ये झालेल्या पोलिस-नक्षल चकमकीत मिळाले आहे. दामरंचा-बोरिया जंगलातील चकमकीत सी-६० जवानांनी ३४ नक्षल्यांना यमसदनी धाडले होते. त्यानंतर २०२१ च्या मर्दीनटोला येथील पोलिस-नक्षल चकमकीत २७ नक्षल्यांचा खात्मा सी-६० जवानांनी केला. या चकमकीत नक्षल्यांच्या एका वरिष्ठ कमांडरलाही ठार करण्यात यश आले होते. या चकमकीतील सी-६० पोलिस दलाच्या जवानांची उल्लेखनीय कामगिरी लक्षात घेऊन तत्कालीन गडचिरोलीचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी ५१ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. या घटनेनंतर नुकतीच १८ जुलै रोजी घडलेली चकमकसुद्धा इतिहासात नाव कोरणारी ठरली आहे. गडचिरोली जिल्ह्यात उपमुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार गडचिरोलीत दौऱ्यावर असताना, शिवाय सर्वत्र मुसळधार पाऊस असताना कशाचीही तमा न बाळगता सी-६० जवानांनी महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील वांडोलीच्या जंगलात १२ नक्षल्यांना ठार केले. ही चकमक अतिशय भीषण होती. सर्वत्र पुराचे साम्राज्य असताना, नक्षल्यांच्या ठिय्याकडे जाण्यासाठी मार्ग नसतानाही जंगलातून वाट काढत सी-६० फोर्सने माओवाद्यांच्या कोरची-टिपागड आणि चातगाव-कसनसूर अशा दोन्ही दलमचा सफाया केला. या चकमकीनंतर पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सी-६० फोर्सच्या जवानांकरिता पुन्हा ५१ लाखांचे बक्षीस जाहीर केले. चकमकीत ज्या नक्षल्यांचा सी-६० च्या जवानांनी खात्मा केला, त्यातील अनेक जहाल नक्षल्यांवर शासनाने बक्षीस जाहीर केले होते. त्या बक्षिसांची रक्कम जवळपास ८६ लाखांची होती. या चकमकीत पोलिसांवर काही जहाल नक्षल्यांना टिपल्याने नक्षल चळवळीची मोठे नुकसान झाले आहे. उत्तर गडचिरोली नक्षलमुक्त करण्याच्या दिशेने हे पाऊल असल्याचे बोलले जात आहे. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली सी-६० च्या जवानांची यावर्षी नक्षल्यांविरोधात धडक मोहीम सुरू आहे. १५ दिवसांपूर्वी झालेल्या चकमकीतील सी-६० फोर्समधील सर्वच जवानांचे उपमुख्यमंत्र्यांनी अभिनंदन करून कौतूक केले आहे. सुमारे ६ तास चाललेल्या या गोळीबारात १२ नक्षल्यांना यमलोकी धाडण्यात पोलिस दलास यश आले. गडचिरोली जिल्ह्याला सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने सी-६० जवान पार पाडीत आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. सुमारे चार दशकापूर्वी सुरू झालेल्या नक्षल चळवळीने सुरुवातीस गडचिरोली जिल्ह्यात उच्छाद मांडला होता. जाळपोळ आणि हिंसाचाराने गडचिरोली जिल्हा धगधगत होता. गडचिरोली जिल्ह्याचा प्रवास करणाऱ्यांना जीव मुठीत घेऊन जावे लागत होते, एवढी नक्षल्यांची जरब होती. यामुळेच जिल्ह्याचा विकासही रखडला होता. दुर्गम भागात विकासाची कामे ठप्प होती. मात्र आता परिस्थिती अतिशय वेगळी असून गडचिरोली जिल्ह्याचे चित्र विकासाच्या दिशेने अधिक स्पष्ट होताना दिसत आहे. या साऱ्या प्रकारात पोलिस प्रशासनातील सोशल पोलिसिंगही तितकेच महत्त्वपूर्ण ठरले आहे. म्हणूनच नक्षल चळवळीतील अनेक जहाल नक्षलवादी पोलिसांपुढे आता आत्मसमर्पण करू लागले आहेत. पोलिस दलानेसुद्धा आत्मसमर्पित नक्षल्यांप्रती आपुलकी दाखवून त्यांना सन्मानाने जगण्याची संधी दिली आहे. आत्मसमर्पित योजनेंतर्गत नक्षल चळवळीतून परत आलेल्या कित्येक जोडप्यांचा सुखी संसार गडचिरोलीच्या सोशल पोलिसिंगमुळे सुरू झाला आहे. याच उत्तम कामगिरीसाठी पोलिस प्रशासनाला राज्य सरकारचा उत्कृष्ट पोलिस दलाचा पुरस्कारही मिळाला आहे. हे सर्व काही शक्य झाले ते नक्षल्यांविरुद्ध लढणाऱ्या सी-६० पोलिस फोर्सच्या कार्यतत्परतेमुळेच. या जवानांनी स्वतःच्या कुटुंबाची, स्वतःच्या जिवाची पर्वा न करता गडचिरोली जिल्ह्याला सुरक्षित ठेवण्यासाठी हाती बंदूक घेतली असून जिल्हावासीयांना आता सुरक्षिततेचा विश्वास प्रदान केला आहे. सी-६० फोर्सला आमचा मानाचा सलाम!

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# हरयाणात रंगणार भाजपा-काँग्रेस-आप तिरंगी लढत

येत्या काही महिन्यात हरयाणा विधानसभेची निवडणूक होत आहे. हरयाणात गेल्या १० वर्षांपासून भाजपाची सत्ता आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला राज्यात अपेक्षित यश मिळाले नाही. लोकसभेतील १० पैकी पाचच जागा भाजपाला जिंकता आल्या. पाच जागा काँग्रेसला मिळाल्या. पाचच जागा जिंकल्यामुळे भाजपा वर्तुळात चिंतेचे वातावरण आहे तर तेवढ्याच जागा जिंकल्यामुळे काँग्रेस गोटात उत्साह पसरला आहे. दोन्ही पक्षांना पाच-पाच जागा मिळाल्या असल्या, तरी यामुळे भाजपाचे पाच जागांचे नुकसान झाले तर काँग्रेसचा पाच जागांचा फायदा झाला आहे. राज्यात विधानसभेच्या ९० जागा आहेत. बहुमतासाठी ४६ जागांची आवश्यकता आहे. लोकसभा निवडणुकीचा निकाल पाहता राज्यातील ४६ विधानसभा मतदारसंघात काँग्रेस आघाडीवर आहे. त्यामुळेच काँग्रेस नेत्यांच्या आणि काँग्रेस नेतृत्वाच्याही अपेक्षा उंचावल्या आहेत.

विधानसभा निवडणुकीला वर्षभराचा कालावधी उरला असताना भाजपाने राज्यात नेतृत्वबदल केला. गेल्या जवळपास नऊ वर्षांपासून मुख्यमंत्री असणारे मनोहरलाल खट्टर यांना हटवून नायबसिंह सैनी यांना मुख्यमंत्री करण्यात आले. राज्यातील विधानसभा निवडणूक भाजपा मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांच्या नेतृत्वात लढवणार आहे. सैनी यांच्या नेतृत्वात भाजपा निवडणूक लढवणार, याचा अर्थ ते भाजपाचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार असतील असा नाही. यावेळी महाराष्ट्र, हरयाणा आणि झारखंड या तिन्ही राज्यांतील विधानसभा निवडणुका भाजपा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावावर, चेहऱ्यावर आणि नेतृत्वात लढवणार आहे. याआधी झालेल्या राजस्थान, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड विधानसभेच्या निवडणुकाही भाजपाने मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर न करता मोदींच्या नेतृत्वात लढवल्या होत्या आणि त्याचा भाजपाला फायदाही झाला होता.

भाजपा मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करणार नसताना काँग्रेसमध्ये मात्र मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करण्यावरून गटबाजी उफाळून आली आहे. काँग्रेस पक्षाची स्थिती ‘बाजारात तुरी आणि...’ अशी झाली आहे. राज्यात काँग्रेसची उमेदवारी मिळावी यासाठी प्रदेश काँग्रेसकडे दोन हजार अर्ज आले आहेत. हरयाणा काँग्रेसमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून हुडा समर्थक आणि हुडा विरोधक असे दोन गट तयार झाले आहेत. हुडा समर्थक गटाचे नेते भूपेंद्रसिंह हुडा आहेत तर हुडा विरोधी गटाचे नेतृत्व कुमारी शैलजा, रणदीप सुर्जेवाला आणि चौधरी वीरेंद्रकुमार यांच्याकडे आहे. चौधरी वीरेंद्रकुमार नुकतेच भाजपातून काँग्रेसमध्ये परतले आहेत. दोन्ही गट पक्षाच्या नेतृत्वाला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करण्याचा आग्रह धरत आहेत. हुडा समर्थक गटाकडून दीपेंद्र हुडा मुख्यमंत्रिपदाचे संभाव्य दावेदार आहेत, तर हुडाविरोधी गटातर्फे कुमारी शैलजा या मुख्यमंत्रिपदासाठी उत्सुक आहेत. या मुद्यावर काँग्रेसच्या नेतृत्वाची पंचाईत झाली आहे. मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला तर एक गट नाराज होणार आणि नाही केला तर दोन्ही गट दुखावले जाणार, ही काँग्रेसच्या नेतृत्वाची डोकेदुखी आहे. दीपेंद्र हुडा यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला तर कुमारी शैलजा, सुर्जेवाला आणि चौधरी वीरेंद्रकुमार गट नाराज होणार आणि शैलजा यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले तर हुडा गट दुखावला जाणार. कोणत्याही एका गटाच्या नेत्याला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले तर दुसरा त्याचे उमेदवार पाडण्यासाठी कामाला लागणार. म्हणजे काहीही केले तरी काँग्रेसचेच नुकसान होणार आहे.

विशेष म्हणजे दोन्ही गटांनी आपापल्या स्वतंत्र पदयात्रा राज्यात सुरू केल्या आहेत. हुडा यांच्या पदयात्रेपासून हुडा विरोधी गटाचे नेते दूर आहेत तर हुडाविरोधी गटाच्या पदयात्रेत हुडा समर्थक नेते दिसत नाहीत. विशेष म्हणजे पदयात्रांच्या पोस्टरमधूनही दोन्ही गटांनी आपापल्या प्रतिस्पर्धी गटाच्या नेत्यांना दूर ठेवले आहे. यावेळच्या लोकसभा निवडणुकीत राज्यात काँग्रेसच्या मतांच्या टक्केवारीत लक्षणीय वाढ झाली आहे. २०१९ मध्ये २८ टक्के मते काँग्रेसला मिळाली होती. यावेळी काँग्रेसच्या मतांची टक्केवारी १५ ने वाढत ४३.६७ टक्क्यांवर पोहोचली आहे. भाजपाने ४६.११ टक्के मतांसह ५ जागा जिंकल्या. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने राज्यातील लोकसभेच्या दहाही जागा जिंकल्या होत्या. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने २०.५० टक्के मतांसह १५ जागा जिंकल्या होत्या, तर भाजपाला ३३.३० टक्के मतांसह ४७ जागा मिळाल्या. भारतीय राष्ट्रीय लोकदलाने २४.२० टक्के मतांसह दुसऱ्या क्रमांकाच्या १९ जागा मिळवल्या होत्या.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला २८.०८ टक्के मतांसह ३१ जागा मिळाल्या होत्या. ३६.४९ टक्के मतांसह भाजपाने ४० जागा जिंकल्या होत्या. जननायक जनता पार्टी १४.८० मतांसह १० जागा जिंकत तिसऱ्या स्थानावर होती. भाजपाने जननायक जनता पार्टीसोबत आघाडी करत सरकार स्थापन केले. मनोहरलाल खट्टर यांनी सलग दुसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. हरयाणा काँग्रेसला तसाही गेल्या काही वर्षांपासून गटबाजीचा शाप लागला आहे. भाजपाच्या दृष्टीने ही जमेची बाजू म्हटली पाहिजे, त्यामुळे याचा फायदा भाजपा कसा उचलू शकते, त्यावर भाजपाचा विजय अवलंबून राहणार आहे. हरयाणाचे राजकारण हे जाटांचे आहे. हरयाणा जाटबहुल राज्य आहे. त्यामुळे हुडा गटाला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला तर राज्यातील जाटेतर मतदार पक्षापासून दूर जातील, असा हुडाविरोधी गटाचा युक्तिवाद आहे. दुसरीकडे जाट समाजातील नेत्याला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले तर राज्यातील सर्व जाट काँग्रेसच्या पाठीशी येईल, असा हुडा गटाचा दावा आहे. त्यामुळे हरयाणा विधानसभेची निवडणूक काँग्रेससाठी वाटते तितकी सोपी नाही. प्रदेश काँग्रेस अध्यक्ष उदयभान हुडा गटाचे आहेत, तर काँग्रेसचे प्रभारी दीपक बाबरियांचा कल हुडा गटाकडे झुकलेला आहे.

हरयाणा विधानसभेची यावेळची निवडणूक तिरंगी होणार आहे. भाजपा, काँग्रेस यांच्यासोबत आपही यावेळी पूर्ण ताकदीने निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. दिल्लीनंतर पंजाबमध्ये मिळालेल्या यशामुळे आपचा उत्साह वाढला आहे. आपचे प्रदेश अध्यक्ष सुशील गुप्ता यांनी राज्यातील विधानसभेच्या ९० जागा स्वबळावर लढवण्याची घोषणा केली आहे. हरयाणा विधानसभा निवडणुकीसाठी आपने आपले घोषणापत्र सुनीता केजरीवाल यांच्या हस्ते जारी केले आहे. मोफत वीज, मोफत आरोग्य उपचार आणि मोफत शिक्षण अशा आश्वासनांचा पाऊस आपने हरयाणातील मतदारांवर पाडला आहे. काँग्रेसमधील गटबाजी, केजरीवालांचा तुरुंगवास आणि राज्यातील तिरंगी लढत ही येत्या विधानसभा निवडणुकीतील भाजपाच्या दृष्टीने जमेच्या बाजू म्हटल्या पाहिजे. याचा भाजपा कसा फायदा उचलणार त्यावर भाजपाची राज्यातील विजयाची हॅट्ट्रिक अवलंबून आहे.

९८८१७१७८१७

## नागपुरात धुळीचे साम्राज्य

नागपूर शहरात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने उसंत घेतली आहे. त्यामुळे आता धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असल्यासारखी स्थिती आहे. सलग काही दिवस आलेल्या पावसामुळे शहरातील अनेक भागांमधील रस्त्यांवरील डांबर उखडले गेले आहे. त्याचा भुरका सर्वत्र पसरला आहे. शिवाय अनेक रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यातून माती बाहेर येऊन सर्वत्र धूळ पसरलेली आहे. भरीस भर प्रशासनाने काही भागांत रस्त्यांचे आणि इतरही काही विकास कामे हाती घेतली आहेत; त्याचीही धूळ पसरत आहे. हिंगणा मार्गावर सुभाष नगर परिसरात आमदार साहेबांच्या घरापासून अवघ्या काही अंतरावर रस्ता खोदून ठेवला आहे. आधी तेथे खड्डे होते; मात्र मार्गक्रमण करता येत होते. आता मात्र प्रशासनाने एक दिवस तो रस्ता बंद करून खोदून ठेवला आहे. त्यामुळे तेथे गिट्टी-मातीचा भुरका मोठ्या प्रमाणावर जमा झाला आहे. अशा परिस्थितीत तेथून मार्गक्रमण करताना वाहन सर्कस करतच चालवावे लागते. एक हात नाका-तोंडावर ठेवून धुळीपासून बचाव करावा लागतो, तर दुसऱ्या हाताने संतुलन सांभाळत वाहन चालवावे लागते. धुळीमुळे डोळ्याची वाट लागते ती वेगळीच. लगतच शाळा असल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांनाही याचा त्रास नक्कीच होत असेल. काम अर्धवट सोडून दिले की काय, असे वाटते. संबंधितांनी याची दखल घेऊन तेथून जाणे-येणे करणाऱ्यांना दिलासा द्यावा, ही अपेक्षा.

**प्रवीण सोनटक्के**/नागपूर

●● ●●

## माणूस आणि वाघ

जागतिक व्याघ्र दिवस नुकताच होऊन गेला. काही वर्षांपूर्वी अवनी नावाची वाघीण विदर्भातील जंगलात माणसांची शिकार करत होती. शिकार करता करता ती स्वतःही शिकार झाली. अतिशय दुःखद घटना. वाघाने माणसावर हल्ला केल्याच्या बातम्या नियमित वाचनात येतात. जगाच्या पोशिंदाचे असे मृत्यू माणसाला चटका लावून जातात. विदर्भात शेतीची कामे करणे आता जोखमीचे झाले आहे. कारण वाघाची भेट कुठेही होऊ शकते. आजकाल माणसाला उपद्रव देणारे वाघ बंदुकीच्याच साह्याने सुरक्षित पकडले जातात. माणसाची शिकार वाघासाठी अत्यंत सोपे काम आहे आणि या सहजपणाचा फायदा घेण्याइतका वाघ हुशार पण आहे. आपल्या आजूबाजूला जिवंत वाघ वावरत आहेत समजल्यावर बाहेर पडणे आणि परिसरातील काम करणे किती कठीण आहे, हे ज्याचं त्यालाच समजू शकतं. त्यातही वाघ जर का माणूस मारणारा असेल तर काही विचारायलाच नको. माणूस आणि वाघ यातील एक बाजू जर का आपल्याला घ्यायची असेल तर अर्थातच माणसाला प्राधान्य द्यावे लागेल. एकेकाळी वाघांची संख्या दयनीय झाली होती. वनविभागाने चांगले काम केल्यामुळे आता त्या संख्येचा उपद्रवही वाढला आहे. माणसाचा जंगलात हस्तक्षेप वाढलेला आहे. वाघाचे खाद्य माणूसही चोरून खायला लागला आहे आणि वाघ माणसाला खाऊ लागला. समृद्ध जंगलासाठी वाघ आवश्यक आहे. पूर्ण नैसर्गिक साखळीत सगळ्यात वरती वाघ आहे. निसर्गात सगळं व्यवस्थित असल्याचं मोठं लक्षण म्हणजे वाघ. वाघ आहे तर शाकाहारी-मांसाहारी सगळे प्राणी सुरक्षित आहेत. वाघ आहे याचा अर्थच जंगल अतिशय समृद्ध आहे. समृद्ध जंगलातील नद्या-नाले बारमाही वाहणारे असणारच. कारण जंगलाची पूर्ण इकोसिस्टिम वाघ स्वतःच सांभाळतो. भारतातील व्याघ्र वैभव सहज सांभाळले जावे आणि माणसाशी त्याचा होणारा संघर्ष कमीत कमी व्हावा, एवढीच सदिच्छा.

**बाबा देशपांडे**/९४२३६१३२२६

●● ●●

## नियम मोडण्यात फुशारकी

आपल्या देशात एखादा कायदा केला तर तो मोडण्यात आणि नंतर स्वतःचेच समर्थन करून, हुज्जत घालण्यात फुशारकी मारणे, हा स्थायीभाव झाला आहे. ही परिस्थिती छोट्या गावांपासून ते मोठमोठ्या शहरांपर्यंत सारखीच आहे. सिग्नल्स न पाळणे, झेब्रा क्रॉसिंगवर गाडी उभी करणे, नो-एन्ट्रीमधून बेफाम गाडी चालवणे, बीआरटी मार्गातून वाहने चालवणे, फूटपाथवर गाड्या उभ्या करणे, विनापरवाना वाहने चालवणे, अल्पवयीन मुला-मुलींना गाड्या चालवू देणे, वळणावर इंडिकेटर्स न देणे, हमरस्त्यावर येताना वेगात गाडी घुसवणे, गाडी रिव्हर्स घेताना योग्य खबरदारी न घेणे, वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे, कानात हेडफोन्स लावून वाहने चालवणे, वाहतुकीच्या रस्त्यावर बेफाम वेगाने आडवी-तिडवी करून दुचाकी चालवणे, मद्य प्राशन करून वाहने चालवणे, सायलेन्सरमधून निघणाऱ्या कर्णकर्कश आवाजासह दुचाकी चालवणे, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसवणे, रस्त्यात भर वाहतुकीत एकदम कुठेही रिक्षा थांबवणे, लेन्सची आणि वेगमर्यादेचे पालन न करणे, डाव्या बाजूने ओव्हरटेक करणे, वाहनावर नियमानुसार रिफ्लेक्टर्स नसणे, आवश्यकता नसतानाही जोरजोरात हॉर्न वाजवणे असे असंख्य प्रकार दिसून येतात. वाहनाचे सर्व दिशादर्शक दिवे व्यवस्थित सुरू असलेले ट्रक किंवा बस कोणालाही दिसली असेल, तर तो नशीबवान म्हणावा लागेल. या आणि अशा कारणांमुळे अनेक अपघात होत आहेत आणि लोकांना आपले जीव गमवावे लागले आहेत. अजूनही वाहनचालकांचे डोळे उघडले नाहीत, हे कटू असले तरी सत्य आहे. सर्व परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे हे पोलिसांनाही शक्य नाही. तेव्हा नियम मोडून फुशारकी मारण्यापेक्षा सुरक्षित वाहन चालवण्यासाठी स्वयंशिस्त हाच एकमेव उपाय आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● निवासी संपादक : प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



बीड : साहित्यरत्न,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात हत्तीवरून मिरवणुक काढण्यात आली. यावेळी आ.संदिप क्षीरसागर, सुशीलाताई मोराळे व अजिंक्य चांदणे यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून अभिवादन केले.

# शिवसैनिकांनो, मला आमदार नाही तर बीडच्या जनतेला आमदार बनवण्यासाठी कामाला लागा-अनिलदादा जगताप



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जुलै**

गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, कामगार आणि सामान्य जनतेसाठी अहोरात्र काम करणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या कार्यपद्धतीला प्रभावित होऊन शिवसेना पक्षात प्रवेश करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. एकनाथ शिंदे साहेब आणि डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शन नेतृत्वाखाली शिवसेनेचे मार्गक्रमन यशस्वीपणे सुरु आहे. त्यामुळे आपल्याला जनतेच्या भल्यासाठी पक्ष संघटना मजबूत करून येणाऱ्या विधानसभेला आपले नेते शिंदे साहेब यांचे हात बळकट करावे लागणार आहेत तरच महाराष्ट्रावर पुन्हा एकदा भगवा फडकला जाईल असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, शिवसैनिकांनो, यंदा विधानसभेला मला आमदार बनवण्यासाठी नाही तर बीड मतदार संघातील प्रत्येक माणसाला आमदार बनवण्यासाठी आणि सामान्यांच्या घरात सत्ता पोहचवण्यासाठी दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करा. पूर्ण ताकदीने कामाला लागा, यंदाच्या निवडणुकीत अनिल जगताप नाही तर बीडचा सामान्य घरातला प्रत्येक माणूस आमदार झाला पाहिजे. असं वक्तव्य शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी शिवसेना पदनियुक्ती तथा प्रवेश सोहळ्या दरम्यान केले.

काल दि. १ ऑगस्ट रोजी दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे पदनियुक्ती तथा प्रवेश सोहळा पार पडला. यामध्ये नव्याने लखन जगताप यांचा शिवसेनेत प्रवेश घेण्यात आला. याबरोबरच विकास लांडगे- विभाग प्रमुख, रणजीत बुंदीले - विभाग प्रमुख, ऋषीकेश जोगदंड-शहर सहसंघटक, अक्षय काशिद- उपशहर प्रमुख यांचा प्रवेश घेऊन नियुक्तीपत्र देत पदनियुक्ती करण्यात आली तर शिवसेना तालुका कार्यकारणीवर रजनीकांत उर्फ गणेश श्रीमंत मस्के- तालुका संघटक, ज्ञानेश्वर नागोराव ढास- तालुका सह सचिव, ढास दादासाहेब त्रिबंक - उपतालुका प्रमुख पदावर नियुक्तीपत्र देत नियुक्ती करण्यात आली. याबरोबरच लिंबागणेश जि. प. सर्कलमधील ढवळे सुरेश दगडु - विभाग प्रमुख, सुर्वे सदाशिव उपविभागप्रमुख, जाधव अशोक श्रीपती - सर्कलप्रमुख, घोलप सुनिल रावसाहेब - सर्कलप्रमुख, वायभट कृष्णा मनोहर -उपसर्कलप्रमुख, वळे दत्ता ज्ञानोबा - उपसर्कल प्रमुख पदावर नियुक्तीपत्र देत नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नंदकिशोर पिंगळे यांनी केले तर सुनील सुरवसे जिल्हा संघटक बीड, संतोष जाधव उप जिल्हाप्रमुख, मकरंद उबाळे तालुका प्रमुख आणि गणेश मस्के तालुका संघटक बीड यांनी आपले मनोगत व्यक्त करत येत्या विधानसभेला पक्ष संघटना मजबुतीसाठी आणि मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करू अशी ग्वाही दिली. अनिलदादा जगताप यांनी आपल्या अध्यक्षीय भाषानात शिवसैनिकांना संबोधित केले. बीड मतदार संघात काम करण्याचे दिशा धोरण ठरवून दिले. पक्ष संघटन वाढवण्यासाठी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले आणि विधानसभाच नाहीतर येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीला शिवसेनाचा भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांना पूर्ण ताकदीने काम करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी शिवसेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकमान्य टिळक विद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१ जुलै**

पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात दि.०१ ऑगस्ट २०२४ गुरुवार रोजी लोकशाहीर तथा साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे जयंती व स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य टिळक पुण्यतिथी उत्साहात साजरा करण्यात आली.

याप्रसंगी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या सुरुवातीला ज्येष्ठ शिक्षक ज्ञानेश मातेकर व विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे, लोकमान्य टिळक व अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी इ.८वीतील कु.प्रिया बळवंत,कु.नेहा वाघमारे यांनी अण्णाभाऊ साठे वंदना सादर केली.तसेच इ.८वीतील कु.विद्या निकम,अस्मिता निकम,गायत्री होळकर,मरियम शेख,शिफा शेख,कु.सुप्रिया साळवे(१०वी) या विद्यार्थिनींनी आपल्या भाषणातून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या जीवनातील विवीध प्रसंगांना उजाळा दिला. ज्येष्ठ शिक्षक ज्ञानेश मातेकर यांनी विद्यार्थ्यांना या दोन्ही महापुरुषांची सविस्तर माहिती सांगताना त्यांच्या जीवनातील क्रांतिकारक प्रसंग अधोरेखित केले.अण्णाभाऊ यांची साहित्य संपदा,त्यांनी उभारलेली कामगार चळवळ,रशियातील प्रवास,संयुक्त महाराष्ट्र लढा याविषयी विवेचन केले.तसेच टिळकां विषयी बोलताना ते म्हणाले की,स्वदेशी, स्वराज्य,राष्ट्रीय शिक्षण आणि विदेशी वस्तूंवर बहिष्कार या चतु:सूत्रीचा वापर करून स्वातंत्र्य संग्रामात इंग्रजांविरुद्ध उठाव करून लोकमान्य टिळकांनी जनमानसात स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग पेटवले.कार्यक्रमात विद्यालयातील सर्व विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता.

## स्वा.सावरकर साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जुलै**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई, संचलित स्वा. सावरकर प्राथमिक विद्यालयात बीड या ठिकाणी *ज्ञानोपासक मंडळा अंतर्गत* साहित्यरत्न,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त बालसभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्षा म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांनी कु. समृद्धी बीडकर , प्रमुख पाहुण्या म्हणून कु. श्रावणी महामुनी तसेच लोकमान्य टिळकांच्या वेशभूषेत चि. अजय मैड व साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठेच्या वेशभूषेत चि.साई महामुनी,चि.आयुष शहाणे ,चि.ओमकार काकडे इत्यादी विद्यार्थी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चि. सार्थक जाधव याने केले.इयत्ता ५वी ते ७वी मधील भरपूर विद्यार्थ्यांनी साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले व भित्तीपत्रकांचे अनावरण करण्यात आले .

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांनी साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या विषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. तसेच अध्यक्ष समारोपात अध्याक्षांनी साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांचे विचार विद्यार्थ्यांना सांगितले.

शाळेचे मुख्याध्यापक श्री . प्रदीप जोशी सरांनी या कार्यक्रमानिमित्त बालसभा आयोजन करणाऱ्या शिक्षिका श्रीमती . पल्लवी खंबायते ताई व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी कार्यक्रमाचे पद्यगायन इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी केले.तसेच सुत्रसंचलन कु.सिध्दी शिंदे व आभारप्रदर्शन कु अदिती आगळे यांनी केले.यावेळी विभाग प्रमुख श्री. सचिन सानप सर यांची उपस्थिती होती.

अशाप्रकारे शाळेत सर्व शिक्षकांच्या सहकार्याने बालसभेचे आयोजन करण्यात आले.

# मुन्शी प्रेमचंद कलम के शिपाई -डॉ. गंगाधर उषमवार

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१ जुलै**

हिंदी साहित्यातील महान साहित्यकार मुन्शी प्रेमचंद हे कलम के शिपाई म्हणून ओळखले जातात असे प्रतिपादन डॉ. गंगाधर उषमवार यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव हिंदी विभाग आयोजित प्रेमचंद जयंती कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे तसेच मंचावर हिंदी विभाग प्रमुख डॉ. युवराज मुळये, डॉ. राजाराम जाधव व प्रा. परमेश्वर पवार उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, हिंदी साहित्याच्या विकासामध्ये प्रेमचंद यांचे मोलाचे योगदान आहे. हिंदी साहित्यामध्ये ३०० पेक्षा जास्त कहानी लेखन करणारे ११ उपन्यास व ३ नाटक आणि इतर साहित्य लिहून हिंदी



साहित्यात मोलाचे योगदान देणारे ते महान साहित्यकार होते. अशा या साहित्यिकाचे साहित्य आजच्या विद्यार्थ्यांनी वाचून आपल्या जीवनामध्ये ते अंगीकारले पाहिजे. त्यांचे सर्व साहित्य हे यथार्थन्मुख आदर्शवादी अशा प्रकारचे होते. समाजामध्ये जगत असताना मानवाला वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी काही उपाय शोधून काढावे लागतात. प्रेमचंद यांच्या साहित्यामध्ये हे सर्व उपाय सापडतात. म्हणूनच विद्यार्थ्यांनी त्यांचे साहित्य जीवनात आत्मसात करावे असे ते म्हणाले.अध्यक्षीय समारोप समोर करताना उपप्राचार्य प्रा.अंकुश साबळे म्हणाले की, प्रेमचंद यांचे लेखन खरोखरच अभ्यासण्याजोगे आहे. ग्रामीण भागातील वेगवेगळ्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी आपल्या साहित्यामधून केले आहे. आदर्श व्यक्ती कसा असावा याचे उदाहरण त्यांच्या साहित्यामधून आपणास दिसते. अशा या महान साहित्यिकास खऱ्या अर्थाने आपण आदरांजली तेव्हाच व्हावू जेव्हा आपण त्यांचे साहित्य आपल्या जीवनामध्ये अंगीकारू असे ते म्हणाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय डॉ.राजाराम जाधव यांनी केला. तर आभार प्रा. परमेश्वर पवार यांनी मानले. या कार्यक्रमास हिंदी विभाग प्रमुख डॉ. युवराज मुळये, डॉ. जिजाराम बागल व हिंदी विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थिती होते.

## महात्मा फुले चौक येथे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१ जुलै**

माजलगाव शहरा पासुन जवळच आसलेल्या फुलेपिंपळगाव मार्गावर महात्मा फुले चौक येथे जग बदल घालुनी घाव मज सांगुनी गेलेत भिमराव! असा संदेश देणारे तसेच *३५ कादंबऱ्या, २२ कथासंग्रह, ३ नाटकं, एक प्रवास वर्णन, १३ लोकनाट्य, १० पोवाडे असे एकूण ९२ अचंबित करणारे साहित्यविष्कार लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी निर्माण करुण मराठी साहित्याची पताका १९५० च्या दशकापासूनच आंतरराष्ट्रीय स्तरावर दिमाखात फडकविण्याचे काम करणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना जयंतीनिमित्त लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन करुण मानवी हक्क अभियान चे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा डॉ मिलींद नाना आव्हाड यांच्या हस्ते निळया ध्वजा चे ध्वजारोहण ओबीसी नेते ज्ञानेश्वर नाना मेंडके यांच्या उपस्थितीत करण्यात आले या ठीकाणी या कार्यक्रमासाठी फुले पिंपळगाव चे माजी सरपंच दशरथ उंबरे,एकता परिषदेचे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे,भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे,माजी सरपंच अभिमन्यू साळवे, प्रल्हाद दळवी,शंकरराव खरात साहेब, बबन खोपे,गोपी,मोहन काकडे,माजी नगरसेवक सुतार,गावातील प्रतिष्ठीत नागरीक संपत दादा साळवे,नाना उंबरे, आसाराम उंबरे,श्रीराम उंबरे, माजी ग्राम पंचायत सदस्य तात्यासाहेब साळवे गावातील प्रतिष्ठीत नागरीक,मोठ्या प्रमाणात उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक साळवे,राजाभाऊ वजीर,नामदेव चिंचाने,आनंद किरवले, आकाश किरवले, भिमराव हिवाळे,गोपाळ गवळी,दयानंद साळवे,अशोक शिंदे,रामभाऊ पडघन,परसुराम खामकर,चंदु कांबळे,बाळु नाईकनवरे, रामभाऊ खदर,अर्जुन फुलगे यांनी परिश्रम घेतले

# तालुका फळरोपवाटिका,बिंदुसरा येथे विभागीय कृषी सहसंचालक डॉ.तुकाराम मोटे यांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जुलै**

आज दिनांक ३० जुलै २०२४ रोजी रोपवाटिका प्रक्षेत्रावरील आंबा, चिकू, पेरू, डाळिंब, मोसंबी,आवळा,चिंच,लिंबू, सिताफळ व इतर कलमा/रोपांची व मातृवृक्षांची पाहणी करण्यात आली. यावेळी आदरणीय सरांनी मार्गदर्शन केले.तसेच विविध कलमे व रोपांच्या निगा व संगोपन बाबत समाधान व्यक्त केले.त्यावेळी रोपवाटिकेच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी आदरणीय आत्मा प्रकल्प संचालक/जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड. श्रीमान सुभाषजी साळवे , मा.उपविभागीय कृषी अधिकारी, बीड ,श्रीमान उद्धवजी गर्जे , मा.कृषी विकास अधिकारी, बीड, श्री.सायप्पा गरांडे , व श्री.अर्जुन चव्हाण, कृषी पर्यवेक्षक, तालुका फोटो वाटिका राजुरी नवगण श्रीमती रेश्मा जाधव मॅडम, कृषी पर्यवेक्षक तालुका बीज गुणन केंद्र, बिंदुसरा. श्री.परेश शिंदे, तालुका भिजून केंद्र, शिदोड, रोपवाटिका प्रमुख श्री. बाबासाहेब राठोड, कृषी पर्यवेक्षक व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# मनसेकडून विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू

## पक्ष निरीक्षकांनी पक्षातील इच्छुक उमेदवार तसेच इतर पक्षातील उमेदवारांची चाचपणी केली

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१ जुलै**

बीड जिल्हासह केज विधानसभा मतदार संघात मनसे देखील मैदानात उतरणार अशे चित्र दिसत आहे,राज ठाकरे यांची मागच्या आठवड्यात स्वबळावर निवडणूक लढवणार असे जाहीर केल्या नंतर महाराष्ट्र भर नेत्यांची फौज विधानसभा निहाय आढावा घेण्यासाठी रवाना झाली आहे.बीड जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघांचा आढावा घेण्यासाठी मनसे चे उपाध्यक्ष सलीम शेख व नरेंद्र तांबोळी हे दोन दिवसा पासून बीड जिल्ह्यात विधानसभा निहाय बैठका घेत आहेत पक्षातील तसेच इतर पक्षातील इच्छुक उमेदवारांची चाचपणी करत आहेत.

केज विधानसभा मतदारसंतील मनसे च्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक देखील घेण्यात आली व इच्छुक उमेदवार व मतदार संघाचा आढावा देखील देण्यात आला आहे.मनसे केज विधानसभा लढवणार हे स्पष्ट झाले असून योग्य उमेदवार राज ठाकरे निवडतील अश्या सूचना देऊन विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागण्याचे आदेश निरिक्षकांनी मनसे च्या पदाधिकाऱ्यांना दिले आहेत.केज येथे केज विधानसभा मतदारसंघातील प्रमुख



पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली या बैठकीला मनसे चे निरीक्षक सलीम शेख,नरेंद्र तांबोळी,मनसे चे बीड जिल्हा अध्यक्ष सुमंत धस,जिल्हा उपाध्यक्ष कल्याण केदार,केज तालुका अध्यक्ष अतुल कुलकर्णी,विद्यार्थी सेना जिल्हा अध्यक्ष गणेश काळे,अंबाजोगाई शहर अध्यक्ष गणेश बरदाळे, ओमकार चाटे,श्रीराम सावंत, संतोष अस्वले,श्री कुलकर्णी आदिंसह मनसे चे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

केज विधानसभा मतदार संघातील इच्छुक उमेदवार रमेश गालफाडे यांची देखील भेट मनसे च्या निरीक्षकांनी घेतली आहे मनसे चे पदाधिकारी व रमेश गालफाडे यांच्या एक तास चर्चा झाली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### राष्ट्रवादीच्या महिला आघाडीकडून निदर्शने

**परभणी,/प्रतिनिधी:** राज्यात महिलांवर अमानुषपणे होणाऱ्या वाढत्याा अत्यााचाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीतर्फे बुधवारी (दि.३१) दुपारी परभणीत जोरदार निदर्शने करण्यात आली.

येथील महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर जिल्हाध्यक्षा मनिषा केंद्रे, शहराध्यक्ष वनिता चव्हाण, कार्याध्यक्ष सलमा शेख, सेलू तालुकाध्यक्षा सौ. निर्मला लिपणे, आशा खिल्लारे, शेख रुकसाना, सीमा घनवटे, बिल्कीस शेख, सविता आंभोरे, संगीता भराडे, जिलानी बी सायरा बी, आशा साळवे, देवीबाई बोराडे, मंदाकिणी रेंगे, सुमेरा हमीद यांच्यासह अन्य महिला कार्यकर्त्याांनी उरण व शिळफाटा येथील दोन घटनांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला. या घटनांमुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उभा राहिला आहे, असे स्पष्ट करीत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनांच्या अपयशाची जबाबदारी स्विकारावी व राजीनामा द्यावा, अशी मागणी या आंदोलनकर्त्याांनी केली.

### ऑफलाईन पध्दतीने धान्य वाटप करा

**एमडीओ संघटनेची मागणी : ई-पॉस मशीनचे सर्व्हर गुल : राशनधारक रस्त्यावर**

**परभणी,/प्रतिनिधी :** मागील काही दिवसांपासून ई-पॉस मशिनचे सर्व्हर डाऊन असल्याने लाभार्थ्यांच्या कुटुंबाची ई-केवायसी व धान्य वितरणाची व्यवस्था ठप्प आहे. त्याामुळे सर्व राशन दुकानांवर राशनधारकांना ऑफलाईन पध्दतीने धान्य पुरवठा करावा, अशी मागणी मायनॉरिटी डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे केली आहे.

जिल्हाध्यक्ष सय्यद रफीक पेडगावकर यांनी बुधवारी (दि.३१) जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना एक निवेदन सादर केले. त्याद्वारे, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना व अंत्याोदय लाभार्थ्यांना बायोमॅट्रिक मशीनद्वारे ओळख पटवून दिल्यानंतर संबंधित लाभार्थींना धान्य वितरण करण्यात येते. परंतु, मागील काही दिवसांपासून ई-पॉस मशीनचे सर्व्हर डाऊन असल्यामुळे बऱ्याच राशन दुकानांवरुन लाभार्थ्यांना धान्याचा पुरवठा करण्यात आलेला नाही. वेळेवर धान्य मिळत नसल्याने स्वत धान्य दुकानासमोर गोंधळ, संताप व संभ्रम निर्माण होत आहे. तसेच लाभार्थी धान्यापासून वंचित राहत आहेत, असे या निवेदनात नमूद केले असून वेळेवर धान्य मिळावे यासाठी तांत्रीक अडचणी लक्षात घेता जोपर्यंत ई-पॉस मशिनचे सर्व्हर सुरळीतपणे सुरू होत नाही तोपर्यंत ऑफलाईन पद्धतीने धान्य वितरण व्यवस्था करावी, अशी मागणी पेडगावकर यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

### ४ ऑगस्ट रोजी राके स्मृती बुध्दीबळ स्पर्धा

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हा बुध्दीबळ संघटनेतर्फे आयोजित कै. वत्सलाबाई राके स्मृती बुध्दीबळ स्पर्धा ४ ऑगस्ट रोजी पाथरी रस्त्याावरील शुभ मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आल्या आहेत.

सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत होणाऱ्या या स्पर्धेत रोख ३० हजार रुपयांची पारितोषिके वितरीत होणार असून प्रत्योक सहभागी खेळाडून प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या स्पर्धा खूल्या गट, अंडर-९, अंडर-१२, अंडर-१५ व महिलांसाठी होणार असून सबंधितांनी स्पर्धा शुल्कासह ३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन संयोजन समितीने केले आहे. संबंधितांनी संपर्कासाठी ९४२००७९०२७, ९४२०१९३७१७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### आरोग्य शिक्षणाच्या सर्वेस सहकार्य करा मनपाद्वारे आवाहन :

**परभणी,/प्रतिनिधी :** पावसाळ्यात पसरणाऱ्या किटकजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने जिल्हा हिवताप कार्यालय यांच्या सहकार्याने सर्वेक्षणाची मोहिम हाती घेतली असून नागरिकांनी आरोग्य शिक्षणासाठीच्या या मेहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

डेंग्यू, मलेरिया वगैरे आजारांच्या पार्श्वभूमीवर या मोहिमेद्वारे घरोघरी पोहोचून आरोग्य सेवक सर्वेक्षण करणार असून डेंग्यू, मलेरिया, चिकनगुणीया व झिंका आजारांसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्या संदर्भात हे आरोग्यसेवक आरोग्यशिक्षण देणार आहेत. डासांची उत्पत्तीस्थाने कशी नष्ट करावी, जसे कुलर्समधील पाणी, मनीप्लांटमधील पाणी, छतावर पडलेली निकामी भांडी, बॉटल्स, नारळाच्या करवंट्या, टायर्स, झाकन नसलेल्या टाक्या, हाऊद यातील पाणी बाहेर फेकून द्यावे, आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळावा, हाऊद आणि टाक्यांना झाकणं लावावे, कुलर्समधील, फुलदाणी व मनीप्लांटमधील पाणी आठवड्यातून एकदा बदलावेत, सांडपाण्याच्या ठिकाणी अळी प्रतिबंधात्मक औषधी टाकावीत, वाहनातील इंधनाचे जळालेले ऑईल टाकावे, घरासह परिसरात पाणी साचु देवु नये.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# योजनांच्या अंमलबजावणीसाठी लाभार्थ्यांची गतीने नावनोंदणी करा- जिल्हाधिकारी गावडे



**परभणी,/प्रतिनिधी :** सामान्य नागरिकांना राज्य शासनाच्या सर्व लोककल्याणकारी योजनांचा विनाव्यत्याय आणि सहज सुलभरितीने लाभ मिळावा. तसेच हा लाभ कमीत कमी आणि आवश्यक कागदपत्रांच्या माध्यमातून मिळावा, यासाठी सर्व विभागप्रमुख तसेच नोडल अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे पात्र लाभार्थ्यांची अधिक गतीने नावनोंदणी करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी आज येथे केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात योजनांच्या आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

व्यासपीठावर निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी श्रीमती संगीता सानप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) विशाल जाधव, महिला व बाल विकास अधिकारी कैलास तिडके, सहायक आयुक्त प्रशांत खंदारे यांच्यासह योजनेचे नोडल अधिकारी यावेळी उपस्थित होते.

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुलींना शिक्षण शुल्क ५० टक्केऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्याची योजना, मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना अशा सर्व महत्त्वाकांक्षी योजनांचा जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी आढावा घेतला. तसेच संबंधित सर्व विभागप्रमुखांनी सांघिक जबाबदारीची भूमिका घेत जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांची नावनोंदणी करून घेण्याचे आवाहन केले.

यावेळी उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे, जिल्हा पुरवठा अधिकारी गोविंद रणवीरकर यांच्यासह विविध योजनांचे नोडल अधिकारी उपस्थित होते. योजनांची ऑनलाईन नावनोंदणी करताना येणाऱ्या अडचणी, लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची पूर्तता आणि ते सादर करावयाची अर्ज प्रक्रिया याबाबतची सद्यस्थिती आणि प्रत्याक्षात येणाऱ्या अडचणी, मार्गदर्शन तसेच योजनेबाबतच्या अद्ययावत सूचना संबंधित विभाग प्रमुखांना यावेळी दिल्या. तसेच लाभार्थ्यांची नावनोंदणी करताना अधिक गतीने करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी आज येथे उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना दिले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये पात्र लाभार्थी महिलांची नावनोंदणी करून घेताना त्याांच्या अर्जात अचूक भरावी. जेणेकरून पात्र महिलेला याचा लाभ मिळेल. तसेच अर्ज हा परिपूर्ण भरण्याबाबत योग्य ती काळजी घेण्याचे जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी सांगितले. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमध्ये पात्र १२, पदवीधारक आणि पदविकाधारक युवकांना कामाच्या अनुभवासोबत विद्यावेतन मिळणार आहे. त्याामुळे राज्य शासनाच्या या योजनेतून कुशल युवावर्ग तयार होणार आहे. तर मुख्यमंत्री वयोश्री योजना आणि मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनाही ज्येष्ठांच्या आरोग्य आणि देश तसेच महाराष्ट्रातील धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी सुरु करण्यात आली असून, या योजनेमधील पात्रतेच्या अटी व शर्तीनुसार नावनोंदणी करून घेण्याचेही यावेळी जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी योजनेची अंमलबजावणी करताना नेमलेल्या नोडल अधिकाऱ्यांना सांगितले.

जिल्हा प्रशासनाकडून दरवर्षी महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी या महसूल सप्ताहामध्ये राज्य शासनाच्या सर्व योजनांचा समावेश करण्यात येणार असून, जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. त्याामध्ये सर्व योजनांचे लाभार्थी सहभागी होतील, याचे नियोजन करण्याचेही श्री. गावडे यांनी यावेळी सांगितले.

## सोनपेठच्या एसबीआय बँकेत पुन्हा पीककर्ज ठप्प



**सोनपेठ,/प्रतिनिधी:-** येथील भारतीय स्टेट बँकेच्या शाखाधिकाऱ्याची दोन महिन्यांपूर्वी बदली झाल्यामुळे रिक्त असलेल्या जागेवर अद्याप पर्यंत नवीन शाखा अधिकारी आलेच नाहीत. त्याामुळे शेतकऱ्यांचे पिक कर्ज प्रकरणं ठप्प झाले होते.

पुढे उप शाखाधिकारी पठाण यांनी सादर पिक कर्ज पुर्वरत सुरू केले होते. परंतु त्याांचीही आता बदली झाली असून सध्या सोनपेठच्या या बँकेला कोणी वालीच उरला नाही.परिणामी पिक कर्जासह नागरीकांचे बँकेतील ईतर कामे पुन्हा ठप्प झाले आहेत. मागील दोन महिन्यापूर्वी सोनपेठ येथील भारतीय स्टेट बँकेच्या शाखा अधिकाऱ्यांची बदली झाली. तेव्हापासून या बँकेला अद्याप पर्यंत शाखाधिकारी मिळाला नाही. सदर बँकेसाठी नवीन शाखाधिकारी पाठवला असल्याचे सांगितले जात आहे, परंतु ते महाशय अद्याप पर्यंत सोनपेठ च्या बँकेकडे फिरकलेच नाहीत.त्याांनी सोनपेठ शाखेचा पदभार घेतला नसल्यामुळे शाखा अधिकाऱ्या शिवाय सोनपेठ शाखेचे कामकाज सध्या रामभरोसे सुरू आहे. अशावेळी तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे पीक कर्जाचे फाईल बँकेतच पडून आहेत, तर तालुक्यातील शेतकरी शेतीच्या पिकासाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी पीक कर्जाच्या फाईल बँकेकडे टाकून या बँकेला खेटे मारताना दिसत आहेत. आता सोनपेठच्या या भारतीय स्टेट बँकेच्या शाखेला नवीन शाखाधिकारी कधी मिळणार? व शेतकऱ्यांसह इतर नागरिकांची ठप्प झालेले कामे कधी पूर्ण होणार? याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे. वरिष्ठांनी या गंभीर बाबीची तात्काळ दखल घेऊन सोनपेठच्या भारतीय स्टेट बँकेला शाखाधिकारी देण्याची मागणी तालुक्यातील नागरिकांतून केली जात आहे.



## शिवसेना उबाठाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतला भारतीय जनता पक्षात प्रवेश

**जिंतूर,/प्रतिनिधी:** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षातील जिंतूर येथील कित्योक वर्षा पासून निष्ठावंत समजणारे पदाधिकारी यांनी बाणेर पुणे येथील स्नेह मेळाव्या मध्ये आमदार सौ.मेघना बोर्डीकर साकोरे यांच्या उपस्थितीत झाला.

जिंतूर येथील शिवसेना युवा सेना तालुका समन्वयक उबाठाचे रमेश अण्णा संगेकर , गजानन धारूरकर गवळी समाज माजी अध्यक्ष, सतीश जोरगेवर युवा सेना माजी शहर प्रमुख,यांनी शिवसेना उबाठाला पक्षाला कंटाळून भाजपा मध्ये प्रवेश केला.त्याा वेळी आमदार सौ मेघना बोर्डीकर यांनी सत्कार करून प्रवेश करून घेतला, त्याा वेळी जिंतूर येथील संदीप अप्पा लकडे, भगवान गुंजकर, नागेश तडकसे, पप्पु डोंबे, संतोष माने, अमोल देशमुख, गजानन पालवे,विक्रम खापरे हे उपस्थित होते.

## मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम साजरा

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** सोनपेठ शहरातील श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठान शहरात व तालुक्यात सतत सामाजिक उपक्रम राबवत समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेतूने विविध महापुरुषांच्या जयंती निमित्त मिरवणुकीत पिण्याच्या पाण्याचे वाटप, आईस्क्रीम चे वाटप, बस स्थानकात थंड जायच्या पाण्याचे वाटप असो वा प्राणी मित्रांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी पाण्याचे हौद, राष्ट्रीय कार्यक्रम १५ ऑगस्ट, २६ जानेवारी सामुदायिक राष्ट्रगान तसेच आर्य वैश्य समाज महाराष्ट्र भुषण एकमेव अद्वितीय असे मा.ना.सुधिर मुनगंटीवार सांस्कृतिक कार्य व वंन मंत्री महाराष्ट्र शासन यांच्या वाढदिवसानिमित्त दि.३० जुलै २०२४ मंगळवार रोजी श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठान सोनपेठ यांच्या वतीने पोलीस स्टेशन प्रांगण येथे करण्यात आला.

यावेळी पोलीस कर्मचारी बांधव, जिजामाता पब्लिक स्कूल प्राचार्य व सर्व शिक्षक वर्ग, श्री महालिंगेश्वर विद्यालय मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दहिखेड मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, एल आर के इंग्लिश स्कूल प्राचार्य व सर्व शिक्षक, डॉ. झाकीर हुसेन हायस्कूल मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, श्री नगरेश्वर मंदिर परिसर अध्यक्ष व सर्व सदस्य, के.र.व. महाविद्यालय प्राचार्य व सर्व प्राध्यापक, व्हिजन पब्लिक स्कूल प्राचार्य व सर्व शिक्षक, बस स्थानक परिसर वाहतूक नियंत्रक व प्रवासी बांधव, श्री मुक्तेश्वर विद्यालय मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, श्रीराम गोशाळा सायखेडा ह भ प काका महाराज सायखेडकर अशा विविध ठिकाणी ३५० विविध मान्यवरांच्या शुभहस्ते विविध वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले तसेच यावेळी पंतप्रधान श्री जिल्हा परिषद केंद्रीय कन्या शाळा येथे तिन लिंबाचे वृक्षारोपण शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा संपादक किरण रमेश स्वामी, जय भवानी मित्र मंडळ संस्थापक अध्यक्ष बळीराम काटे यांच्या शुभहस्ते करण्यात आले .

## मौजे सायखेडा येथे जनावरांचे लसीकरण शिबीर संपन्न

**जिंतूर,/प्रतिनिधी-** आज दिनांक २९/७/२४ रोजी मौजे सायखेडा, तालुका जिंतूर येथे एचडीएफसी बँक सीएसआर व कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्था मलकापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राबवत असलेल्या ''परिवर्तन'' सर्वांगीण ग्रामीण विकास प्रकल्पाच्या माध्यमातून पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती जिंतूर व कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्था, मलकापूर यांच्या द्वारे गावातील पशुपालकांसाठी जनावरांच्या लसीकरण शिबीर आयोजीत करण्यात आले होते, यावेळी गावांतील पशुपालकांच्या गाय, बैल,म्हैस आदी जनावरांचे फऱ्या व घट्टसर्प या आजारा पासूनच्या संरक्षणासाठीची लस देण्यात आली.



आज घडीला सामान्यपणे बघितलं तर जनावरांच्या किमतीमध्ये खूप मोठी वाढ झालेली दिसून येते आज बैलजोडीची किंमत एक ते दीड लाखापर्यंत गेलेली आहे, तसेच गाई म्हशी यांची सुद्धा शेतकऱ्यांना खरेदी करण्यासाठी व आपल्या जनावरांची किंमत ही ५० हजार पासून एक लाखापर्यंत गेलेली आहे, या जनावरांचे येणाऱ्या विविध रोगांपासून किवा आजारांपासून संरक्षण न केल्यास, काही वेळा जनावरे दगवण्याची सुद्धा दाट शक्यता असते आणि यामुळे शेतकऱ्यांना खूप मोठा आर्थिक फटका बसू शकतो, अशा जोखमेपासून पशू पालकांना वाचवायचे असेल तर जनावरांचे वेळोवेळी लसीकरण करणे हे अत्यांत गरजेचे व फायद्याचे राहते व सोबतच जनावरांचे आरोग्य देखील चांगले राहते. त्यामुळे ''परिवर्तन'' सामुदायिक ग्रामीण विकास प्रकल्प, जिंतूर अंतर्गत पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती जिंतूर, पशूवैद्यकीय दवखाना श्रेणी १ चारठाणा व कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्था, मलकापूर यांचे संयुक्त विद्यमाने प्रकल्प गावामध्ये लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमावेळी ''परिवर्तन'' सर्वांगीण ग्रामीण विकास प्रकल्प समन्वयक श्री रमेशजी बादाडे यांनी उपस्थित पशुपालकांशी संवाद साधत लसीकरणाचे महत्व पटवून दिले व सोबतच विविध विषयावरती चर्चा करून येणाऱ्या काळामध्ये दुग्ध व्यवसाय, शेळीपालन व्यवसाय फायद्याचा करण्यासाठी जनावरांचे योग्य व्यवस्थापन व संगोपन यासाठी प्रकल्पाच्या माध्यमातून पशुपालकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असून या उपक्रमाचा जास्तीत जास्त पशू पालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्रकल्पाच्या वतीने केले.

यावेळी सर्व पशुपालक यांनी लसीकरण शिबीर आयोजीत केल्यामुळे समाधान व्यक्त करत पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती जिंतूर, पशूवैद्यकीय दवाखाना श्रेणी १ चारठाणा, बँक , व कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्था व यांचे आभार व्यक्त केले.

डॉ. अब्दुल माजेद, तालुका पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती, जिंतूर व डॉ. इरफान दानिश प्रथम श्रेणी पशुवैद्यकीय दवाखाना चारठाणा यांच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली सदरील लसीकरण शिबीर यशस्वी करण्यात आले.

यावेळी कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्था चे श्री रमेशजी बादाडे(कार्यक्रम समन्वयक), श्री एकनाथ पवणे (पशुतज्ञ), विशाल देशमुख, , सुभाष पिंपळकर, बालाजी पिंपळकर यांची उपस्थिती राहिली याचबरोबर गावचे सरपंच, उपसरपंच, पशुपालक व गावकरी बांधव उपस्थित होते.

# आगामी विधानसभा निवडणूकीत जिल्हयात ४२ नवीन मतदान केंद्राची वाढ

**भारत निवडणूक आयोगाकडून मतदान केंद्र सुमतीकरणाच्या प्रस्तावास मान्यता**

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्ह्यामध्ये ४२ नविन मतदान केंद्र आगामी विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने तयार करण्यात आली असून, एकूण १६२३ मतदान केंद्र आगामी निवडणुकीसाठी सज्ज करण्यात आली आहेत. सर्व मतदान केंद्रासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या नियुक्त्याा करण्यात आल्या असल्याचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी सांगितले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या वतीने १ जुलै, २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम दि.२० जून २०२४ रोजी व सुधारीत कार्यक्रम दि.२४ जुलै, २०२४ रोजी जाहीर करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने दि.२ ऑगस्ट, २०२४ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द होणार असून दि.२७ ऑगस्ट २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द होणार आहे.

मतदान केंद्र सुसुत्रीकरण हा या कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी, राजकीय पक्षांकडून प्राप्त सूचना, मतदार नोंदणी अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांनी मतदान केंद्रास प्रत्याक्ष दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने तसेच भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदशक सूचनेनुसार मतदान केंद्राच्या सुसुत्रीकरणाच्या तयार करण्यात आलेल्या प्रस्तावास भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिली आहे.

मान्यता देण्यात आलेल्या प्रस्तावात ९५ जिंतूर विधानसभा मतदार संघामध्ये १४ मतदान केंद्राची वाढ होऊन एकूण ४३८ मतदान केंद्र झाली आहेत.

९६-परभणी मतदार संघामध्ये ११ केंद्राची वाढ होऊन एकूण मतदान केंद्राची संख्या ३३८ झाली आहेत. ९७-गंगाखेड मतदार संघात २ मतदान केंद्र कमी केले असून, नविन दोन मतदान केंद्र तयार करण्यात आली आहेत, त्याामुळे एकूण मतदान केंद्राची संख्या ४३२ झालेली आहे. तर ९८-पाथरी मतदार संघामध्ये १७ केंद्राची वाढ होऊन एकूण ४१५ मतदान केंद्र झाली आहेत.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल पंधरवाड्यास सुरूवात

## विविध कार्यक्रम, शिबीरे आणि उपक्रमांचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**

महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत जिल्ह्यातील नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा. तसेच त्याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृध्दींगत व्हावा यासाठी विशेष मोहिम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने दि. १ ऑगस्ट महसूल दिनापासून महसूल पंधरवाड्याला सुरुवात झाली.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी दीप प्रज्वलन करून या पंधरवाड्यास सुरूवात केली.

यावेळी बोलतांना अप्पर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी म्हणाले की, महसूल पंधरवाड्यात शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व संबंधित विभागाने एकमेकाशी समन्वय ठेवून महसूल पंधरवाडा कार्यक्रम यशस्वी करावा.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हाधिकारी समाधान घुटुकडे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी राजू एडके, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त यादव गायकवाड, नेहरु युवा केंद्राचे युवा कार्यक्रम अधिकारी आशिष पंत, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त डॉ. राजपाल कोल्हे, सर्व तहसीलदार यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

महसूल सप्ताहामध्ये प्रत्येक दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तालुकास्तरावर समाजाच्या विविध घटकातील नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

यामध्ये १ ऑगस्टला महसूल दिन व महसूल पंधरवाडा शुभारंभ कार्यक्रमांमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, २ ऑगस्टला मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, ३ ऑगस्टला मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, ४ ऑगस्टला स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, ५ ऑगस्टला कृषि मार्गदर्शन कार्यक्रम, ६ ऑगस्टला शेती, पाऊस आणि दाखले, ७ ऑगस्टला युवा संवाद, ८ ऑगस्टला महसूल-जन संवाद, ९ ऑगस्टला महसूल ई-प्रणाली, १० ऑगस्टला सैनिक हो तुमच्यासाठी, ११ ऑगस्टला आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन, १२ ऑगस्टला एक हात मदतीचा दिव्यांगाच्या कल्याणाचा, १३ ऑगस्टला महसूल अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण, १४ ऑगस्टला महसूल पंधरवाडा वार्तालाप तर १५ ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी पुरस्कार वितरण व महसूल पंधरवाडा सांगता समारंभाचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

या व्यतिरिक्त शासन व सामान्य नागरिक यांना जोडणाऱ्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन या पंधरवाड्यामध्ये करण्यात येणार आहे. यामध्ये महसूल विभागाच्या व सर्व संबंधित विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करावे, असे आवाहनही अपर जिल्हाधिकारी परदेशी यांनी यावेळी केले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**

साहीत्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.

शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात साहीत्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधव आणि भगिनी उपस्थित होत्या. अण्णाभाऊ साठे जयंती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची भव्य मिरवणूक काढली. यावेळी ढोलताशा आणि डीजेच्या तालावर तरूणाई थिरकत असतांना दिसत होती.

नगर पालिकेतही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले यावेळी अभियंता रत्नाकर अडसिरे, अभियंता पूतळे, अभियंता दरक यांच्यासह अधिकारी, कर्मचारी तसेच सफाई कर्मचारी पुरूष महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सांदीपनी बहुउद्देशीय मागासवर्गीय संस्था, अण्णाभाऊ साठे वाचनालय, प्रणिका आर्टस यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी समन्वयक आशिष रणशिगे, प्रशासकीय अधिकारी शाम माळवटकर, विजय रामेश्वरे, संतोष मेंडके, गोपाल गाडगे, वर्धमान सोनटक्के, कृष्णा काथुळे, आकाश गायकवाड, कुणाल कांबळे, चेतन भुजवणे, अथर्व वर्मा, मीना रणशिंगे, शशी यादव आदींची उपस्थिती होती. येथील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयातही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक जे एस भट्ट यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# शहरातील समस्या सोडविण्याची भाजपची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**



नगर पालिकेअंतर्गत येणाऱ्या विविध समस्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्यांचे निराकरण करण्यात यावे. या मागणीसाठी भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांची भेट घेत त्यांना निवेदन सादर केले. यावेळी मुख्याधिकारी मुंढे यांनी लवकरच शहरातील समस्यांचे निराकरण युध्दपातळीवर करण्याचे आश्वासन दिले.

बुधवारी भाजपा कार्यकर्त्यांचे एक शिष्ट मंडळ शहरातील नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी जाऊन भेटले. यामध्ये प्रामुख्याने नळाचा पाणीपुरवठा, शहराची स्वच्छता, नाले सफाई, रोगप्रतिबंधक फवारणी, गतिरोधकाची आवश्यकता, मोकाट जनावरांना प्रतिबंध करणे, घंटागाडीच्या समस्या, पथदिव्याच्या समस्या, स्वच्छतागृहाची सफाई, मुख्यमंत्री-लाडकी बहीण योजने संदर्भात येणाऱ्या अडचणी संदर्भात सविस्तर चर्चा मुख्याधिकारी अरविंद मुंढे, नगर अभियंता रत्नाकर अडसिरे, अभियंता नाईक, पुतळे, श्रीमती सनोबर यांच्या समवेत करून या समस्या तातडीने सोडवण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी केली. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनीही मुख्याधिकारी यांचेशी संपर्क साधून चार दिवसात समस्यांचे निराकरण करण्याच्या सूचना दिल्या. काही प्रशासकीय अडचणी आल्यास शासन स्तरावरील प्रश्नांसाठी स्वत: प्रयत्न करणार असल्याचे आ. मुटकुळे यांनी सांगितले. मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी स्वत: जातीने लक्ष देऊन या समस्या तातडीने सोडवण्याचे आश्वासन भाजप कार्यकर्त्यांना दिले.

यावेळेस माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शहराध्यक्ष कैलासचंद्र काबरा, उमेश नागरे, महिला शहराध्यक्ष अलका लोखंडे, उमेश गुठ्ठे, बाबा घुगे, हमीद प्यारेवाले, आशिष जयस्वाल, आशिष शर्मा, पराग जोशी, सुमन थोरात, करण भन्साळी, मनोज शर्मा, सचिन शिंदे, सुमन थोरात, मंदाकिनी चव्हाण, राजेश गोटे, गुड्डू देवकते, सदाशिव सूर्यतळ, रजनीश पुरोहित आदींची उपस्थिती होती.



**हिंगोली- येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ नेते ॲड के के शिंदे, उमेश नागरे, मोतीराम इंगोले, माणिक लोडे, अल्का लोखंडे, राजु यादव, सदाशिव सुर्यतळ, गुड्डु देवकते आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

# नर्सी नामदेव येथे परतवारीनिमित्त आलेल्या भाविकांना फराळाचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**



परतवारी निमित्त संत नामदेव महाराज यांच्या जन्मभूमी नर्सी येथे आलेल्या हजारो भाविकांना काँग्रेसचे नेते प्रकाश थोरात यांचेकडून फराळाचे वाटप करण्यात आले.

कामीका एकादशी तसेच परतवारीला संत नामदेव महाराजांच्या दर्शनासाठी हजारो भाविक नर्सीनामदेव येथे आले होते. यावेळी काँग्रेसचे नेते प्रकाश थोरात यांनी सवड, कडती, केसापूर आदी ठिकाणच्या भाविकांसाठी फराळाची व्यवस्था केली होती. हिंगोली ते नर्सी रोडवरती घोटादेवी पाटी तसेच, सेनगाव नर्सी रोडवरती सरकळी पाटी, तसेच जवळा नर्सी रोडवरती कडती पाटीवर या तीन्ही जागी साबुदाना खिचडी फराळ वाटप करण्यात येत आहे. यावर्षी १२क्विंटलच्या वरती साबुदाना खिचडी वाटप करण्यात आला. यावेळी दासराव थोरात, कोंडबा लोखंडे, गजानन सोळंके, गणेश चौधरी, नारायणराव सोळंके सरपंच गजाननराव थोरात, रामदासजी थोरात, गजानन जाधव, सरपंच रवी डोरले, सुधाकर थोरात, राजकुमार थोरात, अजय थोरात, बळीराम थोरात, अनिल धोंगडे, शिवाजी थोरात, सदाशिव थोरात, अमोल तारे, विशाल तारे, समाधान थोरात, ज्ञानेश्वर थोरात, मनोज थोरात, आकाश तारे, मुरलीधर राऊत, अशोक तारे, राजकुमार थोरात, प्रकाश ठाकरे, सुभाष जाधव, दत्ता थोरात, रामकिसन थोरात मोतीराम जाधव, शंकर जाधव शिवाजी साबळे, गजानन पाटील संदीप थोरात, चंद्रकांत तारे गजानन तारे, संतोष थोरात श्रीराम थोरात शंकर सरकटे दिलीप जाधव किसन काबळे गजानन जाधव भिकाजी जाधव दिनकर जाधव, प्रल्हाद जाधव विठ्ठल जाधव, केशव कांबळे भगवान मापारी, गजानन जाधव, अशोक जाधव, भागवत शिंदे, केशव शिंदे, गणेश शिंदे, विठ्ठल टेकाळे आदींनी फराळ वाटपासाठी परिश्रम घेतले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### विजया चंद्रकांत निलावार यांचे निधन



हिंगोली- येथील व्यापारी चंद्रकांत काशिनाथ निलावार यांच्या पत्नी सौ. विजया यांचे नांदेड येथे एका खाजगी रुग्णालयात ३१ जुलैला सांयकाळी उपचारा दरम्यान दु:खद निधन झाले. मृत्यू समयी त्यांच् वय ७६ वर्ष होते. त्यांच्या पश्चात ४ मूल बिपीन, नितीन, सचिन, राहुल व एक मुलगी दीपा, सूना, जावई, नातवंड, पतवंड असा मोठा परिवार आहे. हिंगोली येथील निरंकारी भवनाच्या मागील बाजूस असलेल्या त्यांच्या निवासस्थानाहून सकाळी १० वाजता अंत्ययात्रा निघून त्यांच्या पार्थीवावर १ ऑगस्ट गुरुवार रोजी हिंगोलीच्या कयाधू स्मशान भूमीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. सौ. विजया चंद्रकांत निलावार यांच्या दु:खद निधनाने आर्य वैश्य समाज व अन्य हितचिंतक, आप्तेष्ट आदींनी हळहळ व्यक्त केली असून त्यांच्या पवित्र आत्म्यास चीर शांती लाभण्यासाठी प्रार्थना केल्या जात आहे.

### तोंडापूर येथील गायरान जमीनीवर घरकुल बांधकामास परवानगी देण्याची मागणी



हिंगोली- कळमनुरी तालुक्यातील तोंडापूर येथील गायरान जमिनीवर घरकुल बांधकार करण्याची परवानगी द्यावी या मागणीसाठी येथील गावकऱ्यांनी साखळी उपोषण सुरू केले. तोंडापूर येथे मागील ५० ते ६० वर्षापासून येथील बौध्द, आदिवासी व इतर समाज राहतो. घरपट्टी, नळपट्टी, दिवाबत्ती सर्व कर भरत आहे. सदर समाजास रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजना, पंतप्रधान आवास घरकुल योजनेंतर्गत सन २०१८-१९ पासून घरकुल मंजूर झाले आहेत. परंतु तोंडापूर ग्रामपंचायत या लाभार्थींना गायरान जमीनीवर घरकुल बांधकामास परवानगी देत नसल्यामुळे येथील गावकऱ्यांनी साखळी उपोषण सुरू केले. या उपोषणाची दखल जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कुंभार यांनी दखल घेत उपोषणार्थींशी चर्चा करून त्यांना लेखी आश्वासन दिल्यानंतर गावकऱ्यांनी उपोषण मागे घेतले. यावेळी उपोषणार्थींनी समाधान व्यक्त केले.

# प्रलंबीत मागण्या मान्य न केल्यास विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**




महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत तसेच शिक्षक-शिक्षिका, सेवानिवृत्त सफाई कामगार, कंत्राटी कामगार यांच्या प्रलंबीत मागण्या मान्य न केल्यास आगामी विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विश्वनाथ घुगे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत तसेच नगर पालिकेअंतर्गत येणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षापासूनच्या प्रलंबीत मागण्यांसाठी नगर पालिका कर्मचारी संघटनेच्यावतीने आंदोलने करण्यात आली तसेच शासनासोबत चर्चा केल्यानंतर आश्वासने देण्यात आली परंतु अद्याप या मागण्यांची अंमलबजावणी होत नसल्यामुळ आगामी विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय कर्मचारी संघटनेने घेतला असून यामध्ये सुमारे १ लाख कर्मचारी सहभागी होणार आहेत.

शासनाने १०० टक्के वेतन कोषागारामार्फत द्यावे, नगर पंचायतीतील उर्वरित सर्व कर्मचाऱ्यांचे समावेशन विनाअट करावे, आश्वासित योजनेची अंमलबजावणी करावी, स्वच्छता निरीक्षकांना पदस्थापना द्यावी, कंत्राटी कामगारांना किमान वेतन लागू करावे, नगर परिषदेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते शासनाकडे वर्ग करावे आदी मागण्यांचा समावेश आहे.

# स्व. राजीव सातव सभागृह कार्यक्रमांसाठी खुले करण्याची व्यापारी संघाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**



नगर परिषदेच्यावतीने बांधण्यात आलेले संसदरत्न स्व. राजीव सातव सभागृह सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी खुले करावे अशी मागणी व्यापारी महासंघाच्यावतीने मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्याकडे करण्यात आली आहे.

शहरातील औंढा रोडवर बांधण्यात आलेल्या स्व राजीव सातव सभागृहाचे काम पुर्ण झालेले आहे. परंतु सदर सभागृह क्षुल्लक कामांमुळे अद्याप खुले करण्यात आले नाही. परिणामी शासनाने दिलेला लाखो रूपयांचा निधी गुंतुन पडला आहे. या सभागृहाचा नागरिकांना कोणताही फायदा होत नसल्याचे दिसत आहे. या सभागृहात प्रेक्षकाकरीता खुर्च्या, विद्युत व्यवस्था, साऊंड सिस्टीम, व्यासपीठ तसेच सभागृहाच्या मोकळ्या जागेत सुशोभिकरण आणि पार्कींगची व्यवस्था करण्यात यावी. शहराला मोठा सांस्कृतिक वारसा असून सुसज्ज सभागृह सुरू झाल्यास उदयोन्मुख कलाकारांना संधी मिळेल. त्यासाठी संबंधित सभागृह लवकरात लवकर खुले करावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर दिलीप चव्हाण, अनिल नैनवणी, नंदकिशोर तोष्णीवाल, संजय देवडा, गजेंद्र बियाणी, जगजीतराज खुराणा, माबुद बागवान, कैलास काबरा, सुरेशअप्पा सराफ, शाम खंडेलवाल, प्रशांत सोनी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# रूक्मीणी विद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत शिक्षण सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**




सेनगाव तालुक्यातील पळशी येथील रूक्मीणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत शिक्षण सप्ताह विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

यावेळी अध्ययन-अध्यापन साहीत्य दिनानिमित्त बौध्दीक खेळ, दृकश्राव्य साधने वापरून अध्यापन निष्पत्ती करण्यात आली. तसेच क्रिडा दिनानिमित्त सांघिक व वैयक्तिक खेळांचे आयोजनप करण्यात आले. यावेळी क्रिडाशिक्षक पवार, धिंवडे यांनी खेळाचे महत्व सांगितले. सांस्कृतिक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात इयत्ता ५ ते १२ वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत देशभक्तीपर गीते, लावणी, अभंग, कोळीगीते, शेतकरी गीते सादर केली. त्यानंतर कौशल्य व डिजीटल उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त विद्यार्थ्यांनी मातीपासून फळे, बाहुली, बैल, पणत्या अशा विविध वस्तुं तयार केल्या होत्या. शनिवारी मिशन लाईफच्या दृष्टीकोनात इको क्लब कार्यक्रमाचे तसेच शालेय पोषण दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. इकोक्लबची स्थापना करून वृक्षारोपन करण्यात आले. या सप्तहाचे उद्घाटन मुख्याध्यापक यांनी केले तर प्रा घोंगडे, प्रा लोणे, प्रा व्ही के काळबांडे यांच्यासह शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# रंग रंगोटीच्या कामापासून विष्णुपुरी प्रकल्पावर चढला 'गुत्तेदारीचा रंग'



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, १ ऑगस्ट -**

येथील कै. डॉ. शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पाचे स्टॉप लॉग गेट वाहून जाणे, मधल्या बाजूचे गेट वाहून जाणे. असे प्रकार मागील काळात घडले असले तरी पाटबंधारे विभागाला याचे गांभीर्य नसून पुन्हा प्रकल्पाचा कारभार गुत्तेदारांच्या हातात देण्यात आला आहे. पूर्वी सर्व कामे यांत्रिकी, विद्युत कर्मचाऱ्यांनीच केली. परंतु रंग रंगोटीच्या कामापासून प्रकल्पावर गुत्तेदारीचा रंग चढला असून शासनाने कायमस्वरूपी या प्रकल्पावर तांत्रिक कर्मचारी नेमण्याची गरज असल्याचे मत सेवानिवृत्त अभियंते तथा कर्मचारी व्यक्त करत आहेत.

कै. डॉ. शंकराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प यांत्रिकी कर्मचाऱ्यांनी विद्युत कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने उभा केला. अनेक वेळा पंपाची देखभाल, पाईपलाईनची दुरुस्ती अभियंत्यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय कर्मचाऱ्यांनी केली. कालांतराने कर्मचारी सेवानिवृत्त झाले. परिणामी कर्मचाऱ्यांची संख्या जवळपास शून्यावर आली आहे. शून्य कर्मचाऱ्यांच्या शेवटच्या टप्प्यात अधिकाऱ्यांनी देखील गलथालपणा केला. उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून कामे करून घेण्याऐवजी गुत्तेदारांकडून कामे करून घेण्यात आली. ही कामे देण्याची पद्धत रंगरंगोटी पासून सुरू झाली. जुलै २०१५ मध्ये प्रकल्प, पाईपलाईन रंग रंगोटी आदिसह अन्य कामासाठी ३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. याच कामापासून प्रकल्पावर गुत्तेदारी सुरू झाली. रंग रंगोटी पासून सुरू झालेली गुत्तेदारीची कामे अगदी गळती बंद करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गोणी टाकण्याच्या व्यवस्थेपर्यंत गेली आहेत. यात शासकीय अधिकाऱ्यांना माल आणि गुत्तेदारांना काम मिळत गेले. त्यामुळे उपलब्ध असलेले कर्मचारी सोकावून गेले आणि अखेर सेवानिवृत्त झाले. आता प्रकल्पाची सर्व जबाबदारी गुत्तेदारावर असल्याचे दिसून येत आहे.

**४० कायम तांत्रिक कर्मचारी असणे गरजेचे**

गुत्तेदारांच्या माध्यमातून काम करताना स्टॉप लॉग गेट वाहून जाणे, मधल्या बाजूचे मोठे गेट वाहून जाणे, लोखंडाची चोरी होणे असे अनेक प्रकार घडले आहेत. कमिशनच्या नादात प्रकल्प वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. नवीन पंप आणि पाईपलाईन कामासाठी १६० कोटी मंजूर करण्याबरोबरच अत्यंत महत्त्वाचे असलेल्या या विष्णुपुरी प्रकल्पवर अभियंत्याबरोबरच किमान ४० कायम तांत्रिक कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# आ. राजेश पवार घेणार शेतकऱ्यांच्या हितांचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, १ ऑगस्ट -**

नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश पवार हे आता आपल्या मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या हितासाठी एक मोठा निर्णय घेण्याची शक्यता असून अगदी तंतोतंत सहकार तत्त्वावर चालणारा व शेतकऱ्यांना जास्तीत जास्त फायदा मिळवून देणारा मोठा साखर कारखाना सुरू करण्यासाठी जागा पाहणी चालू केल्याचे विश्वसनीय वृत्त असून त्या पार्श्वभूमीवर मात्र तथाकथित मंडळींमध्ये एकच खळबळ उडाली आहे.



आमदार राजेश पवार हे धाडसी निर्णय घेऊन त्या निर्णयाची पूर्तता करणारच अशी ख्याती अख्या नायगाव मतदारसंघात पसरली आहे. नायगाव मतदार संघातील तिन्ही तालुक्यातील भौगोलिक क्षेत्र, गोदावरी नदीच्या दोन्ही बाजूने पसरलेले सुपीक खोरे, भारतभर जोडणारी दळणवळण यंत्रणा, वीज, पाणी, रस्ते, आदी कारखानदारीसाठी असलेल्या अनुकूल गोष्टी आमदार राजेश पवार यांच्या नजरेतून सुटल्या नाहीत!

## मतदार संघात साखर कारखानासाठी जागेची पाहणी सुरू!

पश्चिम महाराष्ट्र हा सहकार तत्वावर साखर कारखान्यासहित वेगवेगळे उपक्रम अगदी प्रामाणिकपणे राबवून अग्रेसर राहिला आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये सर्वांनीच सहकार तत्वे प्रामाणिकपणे अमलात आणल्यामुळे भरभराट झाली. पण मराठवाड्यात जे काही साखर कारखाने चालू आहेत आणि बंद पडलेले आहेत ते निव्वळ तथाकथित मंडळींना चरण्यांचे कुरण बनले आहे. त्यातच शेतकऱ्यांची भयंकर लूट होत असते. मनाजोगा ऊसाला भाव मिळत नसतो, भाव मिळाला तर वजनामध्ये काटा मारणे,त्यांच्या बिलांचे पैसे वेळेवर न मिळणे अशा गोष्टी घडत असतानाच या साखर कारखान्यामध्ये राजकारण पण घुसल्या गेले आहे. आम्हाला मतदान केले तरच तुमचा ऊस कारखान्यावर नेवू नाहीतर तो तसाच सडून जाईल अशा धमक्याही जे आज घडीला साखर कारखाने चालू आहेत त्या परिक्षेत्रातील शेतकऱ्यांना आलेल्या असल्याच्या बातम्याही प्रकाशित झालेल्या आहेत.

नायगाव मतदारसंघातील तीनही तालुक्यातील भौगोलिक क्षेत्र हे कारखान्यासाठी अनुकूल असून सुजलाम सुफलाम आहे आणि या भागातील गोदावरी मनार सारखा साखर कारखाना बंद झाला.त्यामुळे शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान होत आहे. एकंदरीतच उपरोक्त सर्व पार्श्वभूमीवर आमदार राजेश पवार हे साखर कारखाना काढण्यासाठी जागा पाहणी करत असल्याच्या प्रतिक्रिया गेल्या दोन महिन्यापासून येत आहेत.

आज दैनिक देशोन्नतीने थेट त्यांच्याशी याबाबत चर्चा केली. आपण खरोखरच साखर कारखाना काढणार का? असा प्रश्न विचारला असता होकार किंवा नकार न देता पश्चिम महाराष्ट्रा प्रमाणे सहकार तत्वावरील साखर कारखानेच नव्हे तर अनेक उपक्रम आपण प्रामाणिकपणे आपल्या मतदार संघात राबवू, त्यामध्ये शेतकऱ्यांनाही भागीदारी देऊ आणि सहकार तत्वावरील साखर कारखाना कसा असतो, त्यामुळे आपल्या भागाचा विकास कसा होतो, प्रत्येक शेतकऱ्यांचे जीवनमान दिवसागणिक कसे उंचावते हे आपण दाखवणारच आहोत अशा प्रतिक्रिया देत अनुकूल जागा मिळताच आपण कुठलीही हयगय न करता साखर कारखाना बांधणी चालू करणार असल्याच्या प्रतिक्रिया त्यांनी दिल्या.

आमदार राजेश पवार हे खरोखरच असे धाडसी निर्णय घेतात व ते सत्यात उतरतात हे मतदारसंघाले पाहिले असल्यामुळे त्यांच्या उपरोक्त निर्णयामुळे तथाकथितां मध्ये एकच खळबळ उडाली असून मतदारसंघातील शेतकऱ्यांमध्ये मात्र एक आश्वासक विश्वासक वातावरण निर्माण होत आहे. नायगाव मतदार संघ परिक्षेत्रात नवीन साखर कारखाना टाकण्यासाठी मार्गदर्शन व जागा अवलोकन करण्यासाठी साखर कारखाना उभारणीसाठी मार्गदर्शन करणाऱ्या कंपनी ची एक टीम आमदार राजेश पवार यांनी मतदार संघात सर्वे साठी नेमली असून गेल्या दोन महिन्यापासून त्या तज्ञ टीमचे सर्वे चालू असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.

## संक्षिप्त वृत्त



### उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने माधव गोटमवाड सन्मानित

**कंधार-** पुणे येथे मराठा चेबर हॉल मध्ये आयोजित दैनिक चालु वार्ता चा तृतीय वर्धापन दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रामध्ये पत्रकार क्षेत्रातील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कला, क्रीडा वृतसंकलन व लिखाणाबद्दल उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार २८ जुलै रोजी पुणे येथील मराठा चेंबर्स सभागृहात पुणे महानगरपालिकेच्या प्रथम महिला तथा पुणे शहर काँग्रेसच्या ज्येष्ठ महिला नेत्या कमल व्यवहारे , प्रशांत गांधी ( सरचिटणीस राष्ट्रवादी) पुणे शहर, दै.चालु वार्ता चे मुख्य संपादक डी. एस.लोखंडे पाटील,बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले,माजी महापौर प्रशांत जगताप, इस्कॉस टेम्पल चे अध्यक्ष प्रभुजी, आम आदमी पक्षाचेचे नेते अनेक राजकीय, सामाजिक नेते या मान्यवरांच्या उपस्थितीत स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, शाल देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आले.दै.चालु वार्ता च्या ३ ऱ्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून पुरस्कार वितरण व सत्कार सोहळाचे आयोजन या वेळी करण्यात आले होते. दै. चालु वार्ताचे संपादक डी एस लोखंडे पाटील ,कमल व्यवहारे, अभिजीत बिचुकले, प्रशांत जगताप, प्रभु, प्रशांत गांधी यांच्या हस्ते हिंदवी स्वराज्याचे संस्थापक जाणते राजे तथा महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, तसेच भारतीय घटनेचे शिल्पकार तथा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले , पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करुन शाल, पुष्पहार श्रीफळ सदर महापुरुषांच्या आदर्शवत अशा कार्यप्रणालीवर प्रकाश टाकला गेला. दैनिक'चालु वार्ता' या मराठी दैनिकाचे कंधार तालुका प्रतिनीधी माधव गोटमवाड यांचा प्रशांत गांधी ( सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे शहर ) यांच्या हस्ते दि. २८ जुलै २०२४ रोजी 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला . कागने कोचिंग क्लासेस कंधार येथे मिळालेल्या पुरस्कारा बद्दल सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थित संचालक परमेश्वर कागने, अंतेश्र्वर कागने, विकास चव्हाण , गावंडे सर उपस्थित होते.. माधव गोटमवाड यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल सामाजिक , राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.यावेळी उत्कृष्ट पत्रकारितेमध्ये अनेक पत्रकारांचा यथोचित मान-सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाच्या समारोपानंतर उपस्थित मान्यवर आणि समस्त पत्रकारांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

### उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे मोफत आरोग्य शिबीर

**देगलूर-**शहरातील भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते दिगंबर कौरवार आणि मित्र परिवार यांच्या वतीने सलग पाच वर्षापासून महाराष्ट्र राज्याचे प्रभावी आणि कर्तृत्ववान उपमुख्यमंत्री सन्माननीय देवेन्द्रजी फडणवीस आणि माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी भाजपा मा. जिल्हाध्यक्ष व्यंकटराव पा गोजेगावकर, उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर, मा नगराध्यक्ष नंदु आण्णा दाशेटवार शिवाजी मामा कनकंटे,उपसभापती रवींद्र पाटील,रमेश पाटील हाळीकर, शिवकुमार देवाडे, मारोती पुलुचवाड, प्रशांत पाटील आचेगावकर अशोक गंदपवार ,भावना दाशेटवार सतिश जोशी , डॉ मलशेटवार, डॉ तम्मेवार, डॉ सुरनर, डॉ पियूष तम्मेवार, डॉ चिलवरवार, डॉ तहाडे, डॉ थडके, डॉ लाडके हे उपस्थित होते.याप्रसंगी एकूण १०७३ रुग्णांची तपासणी करण्यात आली यात डोळ्याचे ७५ रुग्ण तपासण्यात आले, सर्जरी २४२ रुग्ण तपासण्यात आले, दाताचे ७२ रुग्ण, त्वचारोग तपासणी ५८, हृदय रोग , दमा, शुगर यांचे ३५२ रुग्ण तपासण्यात आले, ई. सी. जी.२५, १७ सिटीस्कन,आणि २५ लोकांनी रक्तदान केले. या आरोग्य शिबिराच्या यशस्वीतेसाठी दिगंबर कौरवार यांनी व संतोष आगलावे, विकास मोरे, योगेश मैलागिरे, किरण उल्लेवार, राहुल पेंडकर, अमित पेंडकर, मनोहर देगावकर,गंगाधर दाउलवार ,धनाजी जोशी, शंकर बाबरे ,अन्सारी आजीम, सचिन कांबळे ,अशोक कांबळे, भास्कर कांबळे, सौरभ मधुरवार, नितीन धूप्पेवार, आदींनी परिश्रम घेतले आणि आरोग्य शिबीर यशस्वी करण्यात आले.

# ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या जंगी स्वागतासाठी ओबीसी बांधवांनी उपस्थित रहावे : सुर्यवंशी

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, १ ऑगस्ट -**



वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी आरक्षण बचाव यात्रा. दि. २ ऑगस्ट २०२४ रोजी माळेगाव - माळाकोळी लोहा मार्ग नांदेड येथे जात आहेत सर्व समाज बांधवांनी क्रांतिसूर्य बुद्धविहार समोर सुर्यवंशी कॉम्पलेक्स येथे आरक्षण यात्रेचे माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी यांच्या वतीने वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ऑड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांचे जोरदार आतिषबाजी करून जंगी स्वागत करण्यात येणार आहे. तालुक्यातील ओ बी सी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन गजानन सावकार सुर्यवंशी यांनी केले आहे.

# सिडको येथे डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, १ ऑगस्ट -**

डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सिडको येथील अण्णाभाऊ साठे सभागृह येथे सकाळी १० वाजता सिडको कार्यालयाचे प्रशासक भुजंगराव गायकवाड यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले.



हाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक इतिहासातील एक साहित्यिक म्हणून ओळखले जाणारे साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दि. १ ऑगस्ट रोजी सिडको येथील अण्णाभाऊ साठे सभागृह येथे सकाळी १० वाजता सिडको प्रशासक भुजंगराव गायकवाड यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहन करून. डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी सुख परिसरातील माजी नगरसेविका बेबीताई गोपीले, जनार्दन गुपीले, राघोबा वाघमारे, नारायण कोलंबीकर, माधव डोम्पले, शंकर धिरडीकर, नितीन वाघमारे, केशव कांबळे, माधव आंबटवार, आनंदा गायकवाड, पप्पू गायकवाड, विठ्ठल घाटे,राजू लांडगे, डि.के.कांबळे, संदिप गायकवाड, प्रदिप हानवते, मरीबा बसवंते, विलास गजभारे, विठ्ठल गायकवाड, अमृत नरंगलकर, साहेबराव भंडारे,श्यामराव कांबळे, राजू जमदाडे, भि.ना. गायकवाड, किशन रावणगावकर, करूणा जमदाडे, बालाजी पाटोळे,एस. कुंभारे, आनंदा वाघमारे, नरसिंग दरबार, सुदर्शन कांचनगिरे, आर.जे.वाघमारे, ज्ञानेश्वर ढाकणीकर, प्रमोद मेड, संजय निळेकर, नागेश वाघमारे, विशाल गडंबे, नवनाथ कांबळे, गजानन कहाळेकर यांच्यासह सिडको परिसरातील समाज बांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# ऋतिक बंडेवार यांना बोक्सिंग मध्ये सुवर्णपदक

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड, १ ऑगस्ट -**



ऋतिक बंडेवार या खेळाडूने गोवा येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्तारावरील बॉक्सिंग स्पर्धेमध्ये ऋतिक श्रीनिवास बंडेवार याने सुवर्ण पदक पटकावले.

ब ॅ ि क ग क्षेत्रामध्ये शैक्षणिक पदवी पूर्ण करून खेळावर पण लक्ष केंद्रित केले गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये तामिळनाडूच्या खेळाडूला हरवत महाराष्ट्राचे नेतृत्व करत ऋतिक श्रीनिवास बंडेवार यांनी सुवर्णपदक पटकाविले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्य कौशल्याबद्दल सोनखेड परिसरात सर्वत्र कौतुक करत शुभेच्छांच्या वर्षाव करण्यात येत आहे.

# कंधारमध्ये आज ज्ञानेश्वर महाराज माऊली पठाडे यांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, १ ऑगस्ट -**

कंधार - लोहा विधानसभा मतदारसंघाचे भाग्यविधाते , लोकनेते माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आज दिनांक दोन ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता युवकवीर ज्ञानेश्वर महाराज माऊली पठाडे नगरकर यांचा भव्य कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कीर्तन सोहळ्याला उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी कंधार लोहा विधानसभेच्या करण्यात आले आहे.



नांदेड सह मराठवाड्यातील राजकारणातील संघर्षमय नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे लोकनेते माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात येणार आहे. वाढदिवसानिमित्त भुईकोट किल्ला परिसरातील पांचली मंगल कार्यालय बहादरपुरा येथे दुपारी एक वाजता ज्ञानेश्वर महाराज माऊली पठाडे नगरकर यांचा कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कीर्तन सोहळ्याला भारतीय जनता पार्टीचे अनेक लोकप्रतिनिधी , आजी-माजी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत . दुपारी तीन वाजल्यानंतर लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर हे कार्यकर्ते, पदाधिकारी ,आप्तेष्ट, मित्र मंडळ आणि नातेवाईकांच्या भेटीगाठी घेतील. संवाद साधतील. अभिष्टचिंतन स्वीकारतील अशी माहिती संयोजकाच्या वतीने देण्यात आली आहे . आयोजित कीर्तन सोहळ्याला उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे.



**नांदेड- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.**

# महिलांनी मुख्यमंत्री माझी बहीण योजनेचा लाभ घ्यावा : उमेश मुदखेडे

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, १ ऑगस्ट -**

महाराष्ट्र शासनाच्या संकल्पनेतुन जिल्हाधिकारी डॉ. अभीजीत राऊत नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासक मिनल करनवाल, महिला व बालकल्याण विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी रेखा काळम कदम यांच्या आदेशानुसार महसूल दिनानिमित्त हदगांव तालुका एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाचे बालविकास विकास अधिकारी उमेश मुदखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार १ ऑगस्ट २०२४ रोजी पळसा ग्रामपंचायत कार्यालय प्रांगणात अण्णा भाऊ साठे यांची जंयती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन करून महसूल दिनानिमित्त मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण शिबीर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी उपस्थित महिलांना सिडीपीओ उमेश मुदखेडे यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने विषयी सखोल मार्गदर्शन केले. महिलाच्या अडी अडचणीचे निरासण केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच आशाताई धाडेराव उपसरपंच संजय भाऊ काला होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसिलदार तामसकर होते.यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी उमेश मुदखेडे मंडळ अधिकारी गोडबोले, पर्यवेक्षिका वानखेड, तलाठी प्रदिप कुलकर्णी ग्रामसेवक एम.एम. सोनटक्के, आरोग्य सहाय्यक संतोष स्वामी, शंकरराव कदम,माजी सरपंच रणजित कांबळे, कुबेरराव राठोड किन्हाळकर, सामाजिक कार्यकर्त्या सविताताई निमडगे, ग्रामपंचायत सदस्य, सदस्या, गावातील प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार बांधव अंगणवाडी सेविका मदतनीस महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन आभार गजानन मस्के पळसेकर यांनी केले.

# राष्ट्रीय लोकअदालतीच्या माध्यमातून १० हजार ३२३ प्रकरणे समोपचाराने निकाली

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, १ ऑगस्ट -**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या आदेशान्वये नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुरेखा कोसमकर यांच्या उपस्थितीत नांदेड जिल्ह्यातील सर्व न्यायालयात शनिवार २७ जुलै २०२४ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. नांदेड जिल्हयामध्ये एकुण १० हजार ३२३ प्रकरणे सामोपचाराने निकाली निघाली असून रक्कम २३ कोटी २८ हजार ८२९ इतक्या रकमेबाबत विविध प्रकरणांत तडजोड झाली.

यामध्ये दिवाणी, फौजदारी, धनादेश अनादरीत झालेली प्रकरणे, बँक प्रकरणे, मोटार वाहन अपघात नुकसानभरपाई, भूसंपादन, ग्रामपंचायतीचे घरपट्टी व पाणीपट्टीचे प्रकरणे तसेच कौटुंबिक न्यायालय, कामगार न्यायालय, सहकार न्यायालय व ग्राहक तक्रार मंच येथील प्रलंबीत प्रकरणांचा व नांदेड वाघाळा महानगर पालिका, पंचायत समिती व ग्रामपंचायतींचे वसुली प्रकरणे, विविध बँकांचे तसेच विद्युत प्रकरणे, दुरसंचार विभागाची टेलिफोन, मोबाईल यांचे दाखलपुर्व प्रकरणे इत्यादींचा समावेश होता. तसेच पाच दिवस घेण्यात आलेल्या विशष मोहीमेअतंर्गत ८९७ प्रकरणे निकाली काढण्यात आले आहे.

